मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३०३ ■ गुरुवार, १६ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# ४८ हजार कोटींच्या थकीत वीज बिलांतून बळीराजाची कायमची मुक्ती! - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घोषणा



**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७.५ हॉर्स पॉवरपर्यंतच्या शेतीपंपांच्या वीजबिलांची तब्बल ४८ हजार कोटी रुपयांची जुनी थकबाकी माफ करण्याची घोषणा केली आहे. मुंबईत भाजप किसान मोर्चातर्फे आयोजित सत्कार समारंभात त्यांनी हा निर्णय जाहीर केला. या निर्णयानुसार, ७.५ एचपीपर्यंतच्या वीजपंपधारक शेतकऱ्यांच्या नावावरील सर्व जुनी थकीत वीजबिले पूर्णपणे माफ करण्यात येणार असून, त्यामुळे शेतकऱ्यांना जुन्या थकबाकीच्या ओझ्यातून दिलासा मिळणार आहे. महायुती सरकारने यापूर्वी शेतीसाठीचा चालू वीज वापर मोफत केला असला, तरी मागील कालावधीतील थकीत वीजबिले शेतकऱ्यांच्या खात्यावर कायम होती. आता ही थकबाकी पूर्णपणे रद्द करून शेतकऱ्यांना नव्याने सुरुवात करण्याची संधी मिळणार आहे. जुनी थकबाकी असल्यामुळे नवीन वीजजोडणी, विविध शासकीय योजनांचा लाभ किंवा इतर प्रशासकीय प्रक्रियांमध्ये येणाऱ्या अडचणी दूर होण्यास या निर्णयामुळे मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. या घोषणेमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना थेट आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्र्यांनी यावेळी राज्यातील शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा वाढविण्याच्या सरकारच्या उद्दिष्टाचाही पुनरुच्चार केला. सध्या राज्यातील सुमारे ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होत असून, चालू वर्षअखेरपर्यंत हे प्रमाण १०० टक्क्यांपर्यंत नेण्याचे लक्ष्य सरकारने ठेवले आहे. रात्रीच्या सिंचनादरम्यान शेतकऱ्यांना सर्पदंशासारख्या अपघातांचा धोका टाळण्यासाठी दिवसा वीजपुरवठ्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सौरऊर्जा प्रकल्पांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा ८ ते १२ तास मोफत वीज उपलब्ध करून देण्याचेही सरकारचे नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली. या वीजबिल माफीचा आर्थिक भार सामान्य ग्राहकांवर टाकला जाणार नसून, वीज वितरण कंपन्यांना आवश्यक आर्थिक सहाय्य देण्यासाठी राज्य सरकार दरवर्षी २५ हजार कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' अधिक व्यापक करण्यासाठी त्यातील जाचक अटी व निकष हटविण्याचा निर्णयही सरकारने घेतल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

---

# अजयजी कापरे यांची पनवेल शहर जिल्हा काँग्रेसच्या सचिव व प्रवक्तापदी निवड

**दैनिक युवक आधार**

**मारुती सत्रे, महाराष्ट्र संपर्कप्रमुख :** आष्टी तालुक्यातील रुई नालकोल गावचे भूमिपुत्र श्री. अजयजी कापरे यांची पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सचिव व प्रवक्तापदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.



सामाजिक, राजकीय आणि जनसंपर्क क्षेत्रातील सक्रिय कार्यामुळे श्री. कापरे यांनी अल्पावधीतच आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध वृत्तवाहिन्या आणि वृत्तपत्रांमध्ये महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्यामुळे त्यांचा संपूर्ण महाराष्ट्रातील तरुण वर्गाशी चांगला संपर्क असून, त्याचा लाभ काँग्रेस पक्षाची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी होणार असल्याचे मानले जात आहे. शांत, संयमी आणि स्पष्टवक्ते अशी त्यांची ओळख असून, त्यांच्या निवडीचे विविध स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे. अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

देशात सध्या राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचा जनाधार वाढत असल्याचे राजकीय विश्लेषकांकडून सांगितले जात आहे. भारत जोडो यात्रा आणि त्यानंतरच्या जनसंवाद मोहिमांमुळे राहुल गांधी हे सर्वसामान्य जनतेतील नेतृत्व म्हणून अधिक प्रभावीपणे पुढे येत असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात राज्यात काँग्रेस पक्षात संघटनात्मक पातळीवर महत्त्वपूर्ण बदल घडत असून, सामान्य कुटुंबातील तरुणांना पक्ष संघटनेत जबाबदाऱ्या देण्यावर भर दिला जात आहे.

पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष डॉ. श्रुती शाम म्हात्रे यांच्या नेतृत्वालाही कार्यकर्त्यांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या रूपाने काँग्रेस पक्षाला निर्भीड, धडाडीचे आणि जनसामान्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील असे नेतृत्व लाभले असून, पनवेल परिसरात पक्ष संघटना बळकट करण्यासाठी त्या सातत्याने कार्यरत असल्याचे कार्यकर्ते सांगतात.

यावेळी श्री. अजयजी कापरे यांनी पक्षाने दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करण्याचा निर्धार व्यक्त केला. "सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी, युवकांना पक्षाशी जोडण्यासाठी आणि काँग्रेसची विचारधारा अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी मी सातत्याने कार्यरत राहीन," असे त्यांनी सांगितले.श्री. कापरे यांच्या नियुक्तीमुळे पनवेल शहर जिल्हा काँग्रेसला नवचैतन्य मिळेल आणि आगामी काळात पक्ष संघटन अधिक मजबूत होण्यास मदत होईल, असा विश्वास काँग्रेस कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## जग आता नवी मुंबईच्या अधिक जवळ

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिले आंतरराष्ट्रीय नियोजित विमान दाखल



**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने आज आपल्या इतिहासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला. अबू धाबीहून आलेले एअर इंडिया एक्सप्रेसचे IX208 हे पहिले नियोजित आंतरराष्ट्रीय विमान आज सकाळी 10. 20 वाजता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले.या ऐतिहासिक आगमनानिमित्त विमानाला पारंपरिक 'वॉटर कॅनन सलामी' देऊन स्वागत करण्यात आले. या सोहळ्याने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आंतरराष्ट्रीय सेवांच्या शुभारंभाची नोंद झाली असून, भारताच्या नव्या जागतिक प्रवेशद्वाराच्या भूमिकेला अधिक बळकटी मिळाली आहे. या पहिल्या आंतरराष्ट्रीय नियोजित उड्डाणामुळे नवी मुंबईचा जगाशी थेट संपर्क अधिक सुलभ झाला असून, प्रवासी, व्यापार आणि पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.










# जेएसडब्ल्यूचा रेडीमिक्सर ट्रक पाल्हे पुलावर पोहोचलाच कसा? धोकादायक पुलावरील बंदीचे उल्लंघन; जबाबदार कोण?

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशांना आव्हान; बॅरिअर तोडून अवजड वाहनाची बिनधास्त एंट्री लोखंडी बॅरिअर तोडून वाहतूकबंदीची उघड पायमल्ली

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग रेवदंडा निलेश फुंडे प्रतिनिधी** : अलिबाग तालुक्यातील धोकादायक घोषित करण्यात आलेल्या पाल्हे पुलावरील अवजड वाहनांच्या वाहतुकीवरील बंदीची पुन्हा एकदा पायमल्ली झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी उघडकीस आली. जेएसडब्ल्यू कंपनीचा एमएच 46 सीयू 2873 क्रमांकाचा रेडीमिक्सर ट्रक पुलासमोरील लोखंडी बॅरिअर्सला धडक देत ते तोडून पुढे गेल्याने जिल्हा प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वाहतूक नियंत्रण यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये अलिबाग-आक्षी मार्गावरील बेली पूल आणि सहाण बायपासवरील पाल्हे पूल हे वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वर्षभरापूर्वीच या पुलांवरून जड व अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी घालणारे आदेश जारी केले होते. या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलांच्या दोन्ही बाजूंना लोखंडी बॅरिअर्स आणि इशारा फलक उभारले आहेत.पाल्हे पुलावर १६ टनांपर्यंतच्या वाहनांना, तर बेली पुलावर केवळ ५ टनांपर्यंतच्या वाहनांनाच परवानगी आहे. असे असतानाही अवजड रेडीमिक्सर ट्रकने बॅरिअर तोडून पुढे जाणे ही केवळ नियमभंगाची बाब नसून प्रशासनाच्या आदेशांना उघडपणे दिलेले आव्हान असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.विशेष




म्हणजे, राज्यातील मोठ्या औद्योगिक कंपन्यांपैकी एक असलेल्या जेएसडब्ल्यूसारख्या कंपनीला या पुलावरील वाहतूकबंदीची माहिती नसणे अशक्य असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे "इतक्या मोठ्या कंपनीचा रेडीमिक्सर ट्रक बंदी असलेल्या पुलापर्यंत पोहोचलाच कसा?", "वाहतुकीचे नियोजन करणारे अधिकारी कुठे होते?", "वाहतूकबंदीची माहिती चालकाला देण्यात आली नव्हती का?", "की अशा आदेशांना आता कोणीही गांभीर्याने घेत नाही?" असे संतप्त सवाल जनतेतून उपस्थित केले जात आहेत.स्थानिक नागरिकांच्या मते, जर धोकादायक घोषित पुलावरून अशा प्रकारे अवजड वाहने सर्रास धावणार असतील, तर जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने उभारलेले बॅरिअर्स यांचा उपयोग तरी काय? एखादी मोठी दुर्घटना घडून जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त प्रश्नही नागरिक विचारत आहेत. यापूर्वीही पाल्हे पूल आणि बेली पुलावरून अवजड वाहनांची वाहतूक झाल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. मात्र, नियमभंग करणाऱ्यांवर ठोस कारवाई झाल्याचे चित्र दिसत नसल्याने वाहनचालक आणि कंपन्यांचे धाडस वाढत असल्याचा आरोप होत आहे.

दरम्यान, संबंधित ट्रक चालक, ट्रान्सपोर्ट कंत्राटदार तसेच जबाबदार कंपनी व्यवस्थापनाविरोधात तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, बॅरिअर्सची तोडफोड करणाऱ्यांकडून नुकसानभरपाई वसूल करण्यात यावी आणि पुलावरील वाहतूकबंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कायमस्वरूपी पोलिस व यंत्रणांची नियुक्ती करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

धोकादायक घोषित पुलावर बॅरिअर तोडून अवजड वाहन घुसते, आदेश धाब्यावर बसवले जातात, आणि प्रशासन मात्र पाहत राहते; ही परिस्थिती भविष्यातील एखाद्या मोठ्या दुर्घटनेची नांदी ठरू नये, अशी तीव्र भावना आता अलिबाग तालुक्यात व्यक्त होत आहे.

# चांद्रयान–३ मोहीम माहितीफलकाचे अनावरण....!!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : १४ जुलै २०२३ रोजी सतीश धवन स्पेस स्टेशन,श्रीहरीकोटा येथून चंद्रयान ३ आजच्या दिवशी अवकाशात झेपावले होते.याचीच माहिती येणाऱ्या पिढीला असावी यानिमित्त सेक्टर 5A, करंजाडे येथे आज राष्ट्र प्रथम फाउंडेशन यांच्या वतीने चंद्रयान ३ माहिती फलकाचे अनावरण झाले.




भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (ISRO) चांद्रयान-३ मोहिमेद्वारे भारताच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रात सुवर्ण इतिहास रचला. या ऐतिहासिक यशाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी, त्यांच्यामध्ये विज्ञान, अंतराळ संशोधन आणि नवकल्पनांबद्दल कुतूहल व आवड निर्माण व्हावी, तसेच भारताच्या अभिमानास्पद अंतराळ प्रवासाची प्रेरणा मिळावी या उद्देशाने चांद्रयान-३ माहिती फलकाचे (Board) उद्घाटन करण्यात आले.हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, देशाभिमान आणि भविष्यामध्ये संशोधन क्षेत्रात योगदान देण्याची प्रेरणा निर्माण करणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. चांद्रयान-३ हे केवळ भारताचे यश नसून प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे.यावेळी उपस्थित श्री.सुमित बांगर,श्री. प्रदिप थोरात,सुभाष राळे,श्री. बाळासाहेब आवारी,श्री. अविनाश गायकवाड,श्री. अनिल आले,श्री. राहूल शेटे,श्री.प्रथमेश फडणीस,राजू शेडगे,श्री. रामदास शिर्के,श्री.अतुल तांबे.यापुढील काळात अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येतील असे श्री.किरण शिंदे साहेब यांनी नमूद केले.श्री.दत्तात्रय गायकवाड यांचे आभार मानण्यात आले.

# के.टी.एस.पी. मंडळाच्या शिशुमंदिर इंग्लिश मीडियम स्कूल वावोशीमध्ये 'पालकत्व व बालविकास' मार्गदर्शन सत्र संपन्न

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे :** के.टी.एस.पी. मंडळाच्या शिशुमंदिर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये पालकांसाठी 'पालकत्व व बालविकास' या विषयावर मार्गदर्शन सत्र उत्साहात संपन्न झाले. या प्रसंगी पॅरेंटिंग अँड चाइल्ड डेव्हलपमेंट ऑफिसर संदीप मोरे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक पालकत्व, प्रभावी संवाद, चांगले संस्कार, भावनिक विकास आणि बदलत्या काळात पालकांची भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

के.टी.एस.पी मंडळ शिशु मंदिर विधार्थीसाठी नवनवीन उपक्रम राबवत असल्याने पालकवर्गात आनंदाचे वातावरण पाहवयास मिळत आहे भविष्यात या शाळेत पालक वर्गाचा ऍडमिशनसाठी



कल वाढलेला पाहवास मिळणार असल्याचे बोलले जात आहे

या कार्यक्रमास शाळेच्या प्राचार्या सोनाली जाधव तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. कार्यक्रमास पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालक आणि शाळेतील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# संजू उत्तम चव्हाण; कोकण विभागीय उपसंचालक (माहिती)पदी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोकण विभागीय उपसंचालक (माहिती) या रिक्त पदावर सरळ सेवेने नवनियुक्त झालेले संजू उत्तम चव्हाण यांनी आज आपल्या पदाचा कार्यभार अधिकृतपणे स्वीकारला आहे. नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील कोकण भवनमधील विभागीय माहिती कार्यालयातील उपसंचालकांच्या दालनात एका छोटेखानी आणि उत्साही कार्यक्रमात हा पदभार सोहळा संपन्न झाला. आतापर्यंत या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार ठाणे जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांच्याकडे होता. त्यांनी अत्यंत यशस्वीपणे ही जबाबदारी सांभाळत आज नवनियुक्त उपसंचालक श्री. चव्हाण यांच्याकडे या पदाची अधिकृत सूत्रे सुपूर्द केली आणि त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

या सोहळ्याप्रसंगी ठाणे जिल्हा माहिती



अधिकारी मनोज सानप यांच्यासह विभागीय माहिती कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय कोकण विभागांतर्गत येणाऱ्या ठाणे, रायगड, पालघर आणि रत्नागिरी येथील जिल्हा माहिती कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) या कार्यक्रमाला हजेरी लावली होती.

नवनियुक्त उपसंचालक श्री. चव्हाण यांना पत्रकारिता, माध्यम आणि जनसंपर्क क्षेत्रातील तब्बल 13 वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी यापूर्वी दैनिक 'सकाळ' (पुणे आणि मुंबई), दैनिक 'पुण्यनगरी' (पुणे) आणि दैनिक 'नवभारत' (पुणे) या नामांकित वृत्तपत्रांमध्ये विविध पदांवर यशस्वीपणे काम केले आहे. श्री. चव्हाण यांनी जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन (पत्रकारिता व जनसंवाद) या विषयात पदव्युत्तर पदवी (Post Graduation) संपादन केली असून, सध्या ते 'जनसंपर्क' (Communication) या विषयात पीएचडी (PhD) करत आहेत.

नव्याने श्री. संजू चव्हाण यांनी पदभार स्वीकारल्यानंतर उपस्थितांचे त्यांनी आभार मानले आणि कोकण विभागातील शासकीय योजनांचा प्रचार अन् प्रसार अधिक प्रभावीपणे करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. या पदभार हस्तांतरण कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि माध्यम प्रतिनिधींनी श्री. चव्हाण यांना त्यांच्या भावी यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे माझे कर्तव्य : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** "दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांची वानवा असते. त्यामुळे अशा शाळेत जाणाऱ्या मुलांना शैक्षणिक मदत करून त्यांचे जीवनमान उंचावणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे दफ्तर, छत्री यांसारख्या प्राथमिक सुविधा देण्याचा गेली १५ वर्षे मी सातत्याने प्रयत्न करीत आहे. कर्जत तालुक्याशी आपले वेगळे नाते आहे ," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी कर्जत येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले. पनवेल तालुक्यातील शेलघरच्या यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेतर्फे कर्जत येथील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना दफ्तर आणि छत्रीचे मंगळवारी (ता. १४) वाटप करण्यात आले. कर्जत येथील रायगड जिल्हा परिषदेच्या खांडस, तुंगी, आंबेरपाडा, काठेवाडी, तेथील अंगणवाडी आदी सहा शाळांतील ३५० विद्यार्थ्यांना यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे




संस्थापक-अध्यक्ष आणि आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत, शुभांगीताई घरत यांच्या वतीने हे शैक्षणिक दान करण्यात आले. यावेळी महेंद्रशेठ घरत यांचे कुटुंबीय हिरीरीने सहभागी झाले होते. यावेळी कर्जतच्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांनीही भावना व्यक्त केल्या, ते म्हणाले, "महेंद्रशेठ घरत यांच्यासारखे दानशूर समाजात आहेत, याचा आम्हाला रास्त अभिमान आहे. दरवर्षी आमच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करून ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत मोलाचा वाटा उचलत आहेत." यावेळी राम म्हात्रे, वासंती म्हात्रे, गुलाबशेठ घरत, ललितताई घरत, श्रीकांत घरत, मिनाक्षी घरत, शकुंतलाताई ठाकूर, बानुबाई भगत, यशवंत ढोंगे आणि एम. जी. ग्रुपचे सहकारी उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागाचे अतिरिक्त नवीन दूरध्वनी क्रमांक प्रसिद्ध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत अधिक तत्पर व प्रभावी सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत अतिरिक्त नवीन दूरध्वनी क्रमांक प्रसिद्ध करण्यात आले आहेत. आग, पूर, झाड कोसळणे, इमारत दुर्घटना तसेच इतर आपत्कालीन प्रसंगी नागरिकांनी संबंधित अग्निशमन केंद्राशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन अग्निशमन विभागाने केले आहे.नागरिकांच्या सोयीसाठी पनवेल, नवीन पनवेल, कळंबोली तसेच कामोठे उप अग्निशमन केंद्रांच्या जुन्या दूरध्वनी क्रमांकांसोबतच



अतिरीक्त नवीन दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच याबाबत Panvel Connect ॲप आणि महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरूनही आवश्यक माहिती मिळू शकते.

**दूरध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे :**

पनवेल अग्निशमन केंद्र – कार्यरत दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४६1500, नवीन दूरध्वनी क्रमांक ०२२-65798600

नवीन पनवेल अग्निशमन केंद्र – कार्यरत दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२३३७, ०२२-६९३६५६७०, नवीन दूरध्वनी क्रमांक 02265008700

कळंबोली अग्निशमन केंद्र – कार्यरत दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४२०१३८ / ०२२-२७४20138, नवीन दूरध्वनी क्रमांक 02265430800

कामोठे उप अग्निशमन केंद्र – कार्यरत दूरध्वनी क्रमांक 8454924845, 8454818945, नवीन दूरध्वनी क्रमांक 02265430700

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी शांतता राखून संबंधित अग्निशमन केंद्राशी संपर्क साधावा व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने केले आहे.

# माहिती दडवणे बेतले महागात! आष्टीत जलजीवन योजनेची माहिती लपवणाऱ्या अधिकाऱ्याला २५ हजारांचा दंड

## कैलास दरेकरांच्या पाठपुराव्याला यश; बीड झेडपी प्रशासनात खळबळ

**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा संपर्क प्रमुख मारुती सत्रे आष्टी :** आष्टी मतदारसंघातील बहुचर्चित जलजीवन योजनेची माहिती दडवणे बीड जिल्हा परिषदेच्या एका तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्याच्या चांगलेच अंगलट आले आहे. माहिती अधिकार अधिनियमाची (२००५) उघडपणे पायमल्ली केल्याप्रकरणी राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने या अधिकाऱ्याला तब्बल २५ हजार रुपयांचा दणका दिला आहे. कैलास दरेकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून, माहिती दडवून बसणाऱ्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

आष्टी मतदारसंघातील जलजीवन मिशनच्या कामांमध्ये पारदर्शकता यावी, या उद्देशाने कैलास दरेकर यांनी २४ मे २०२५ रोजी माहिती अधिकारांतर्गत अर्ज दाखल करून सविस्तर माहिती मागवली होती. मात्र, बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्याने या अर्जाला केराची टोपली दाखवली. कायद्यानुसार मुदतीत माहिती देणे बंधनकारक असतानाही, या अधिकाऱ्याने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. केवळ माहितीच लपवली नाही, तर वस्तुस्थितीही दडवून ठेवत कायद्याप्रति पूर्णपणे नकारात्मक दृष्टिकोन दाखवला.

अधिकाऱ्याच्या या मनमानी व बेजबाबदार कारभाराविरुद्ध कैलास दरेकर यांनी थेट राज्य माहिती आयोगाचे दरवाजे ठोठावले. आयोगासमोर कागदपत्रे आणि पुरावे सादर झाल्यानंतर अधिकाऱ्याचा भोंगळ कारभार उघड झाला. राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांनी या प्रकरणाची अत्यंत गंभीर दखल घेतली. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) चा थेट भंग झाल्याचा स्पष्ट निष्कर्ष आयोगाने नोंदवला.याप्रकरणी कलम २०(१) नुसार संबंधित जन माहिती अधिकारी कारवाईस पात्र ठरल्याने, कलम १९(८) (क) मधील अधिकारांचा वापर करून राज्य माहिती आयुक्तांनी तत्कालीन अधिकाऱ्यावर २५,००० रुपये (अक्षरी पंचवीस हजार रुपये) इतकी अंतिम शास्ती (दंड) निश्चित केली. ही दंडाची रक्कम '००७०-इतर प्रशासकीय सेवा' या लेखाशीर्षांतर्गत जमा करण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत.

दंडात्मक कारवाईपुरतेच न थांबता, वर्तमान जन माहिती अधिकाऱ्याने कैलास दरेकर यांना त्वरित माहिती उपलब्ध करून द्यावी, असे पूर्वीचे निर्देश आयोगाने कायम ठेवले आहेत. तसेच, या महत्त्वपूर्ण आदेशाची प्रत आवश्यक त्या कठोर कार्यवाहीसाठी बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवण्यात आली आहे. या सडेतोड निर्णयामुळे सर्वसामान्यांची अडवणूक करणाऱ्या आणि माहितीच्या अधिकाराची थट्टा उडवणाऱ्या मुजोर अधिकाऱ्यांना मोठी चपराक बसली आहे.

# जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ.सुरज मडावी यांचा पत्रकार प्रदीप कडबे यांनी केला जाहीर सत्कार



**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे नागपूर :** दिनांक - 14 जुलै 2026 रोजी मंगळवारला नागपूर येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथे, अमरावती येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ.सुरज मडावी यांची नागपूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी पदावर बदली होऊन आलेत त्याबद्दल भीम शाहीर तथा पत्रकार प्रदीप कडबे यांनी शाल, पुष्प, पुस्तक भेट देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथील कर्मचारी शांताराम लाखे, प्रमोद रोडे, रत्न रक्षित शेंडे, रामभाऊ खरे इत्यादी उपस्थित होते.

# डॉक्टरांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य; अमली पदार्थांविरोधात स.पो.नि. सागर कोते यांची ठोस ग्वाही

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : लासलगाव व परिसरात वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या समस्येसह डॉक्टरांवरील वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर लासलगाव डॉक्टर्स असोसिएशनने लासलगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते यांची भेट घेऊन वैद्यकीय व्यावसायिकांच्या सुरक्षिततेसंदर्भातील विविध प्रश्न मांडले. यावेळी डॉक्टरांच्या सुरक्षिततेबरोबरच अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यावर प्रभावी कारवाई करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

बैठकीच्या प्रारंभी डॉ. स्वप्नील जैन यांनी स.पो.नि. सागर कोते यांचे स्वागत केले. डॉक्टर आणि पोलीस प्रशासन



यांच्यात अधिक समन्वय राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. लासलगाव परिसरात वाढत असलेले अमली पदार्थांचे प्रमाण, त्यातून निर्माण होणारे सामाजिक दुष्परिणाम तसेच डॉक्टरांवरील हल्ल्यांच्या घटना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वैद्यकीय व्यावसायिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध व्हावे आणि अशा घटनांवर प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात याव्यात, अशी अपेक्षा असोसिएशनने व्यक्त केली.

यावर स.पो.नि. सागर कोते यांनी डॉक्टरांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, अशी ठोस ग्वाही दिली. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीस लासलगाव डॉक्टर्स असोसिएशनचे डॉ. कैलास पाटील, डॉ. सुरेश दरेकर, डॉ. विजय केंगे, डॉ. विलास कांगणे, डॉ. अनिल बोराडे, डॉ. प्रणव माठा, डॉ. संगीता सुरसे आदी उपस्थित होते.

# पनवेल शहर वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे दोन वेगवेगळया घटनांमध्ये नागरिकांना तात्काळ मदत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे अधिकारी व अंमलदार वाहतूक नियमनासोबतच आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठीही तत्पर असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले.

**पहिली घटना :** न्यू पनवेल सिग्नल येथे कर्तव्य बजावत असताना पोलीस नाईक 4415 विश्वनाथ पाटील व पोलीस शिपाई 12061 संजय घाडगे यांच्या निदर्शनास एका टेम्पो चालकास अचानक



आकडी (फिट) आल्याची घटना आली. दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ धाव घेऊन संबंधित चालकावर प्राथमिक उपचार केले. चालक शुद्धीवर आल्यानंतर वाहन मालकाशी संपर्क साधून त्यास भावेश मालपाणी, रा. पनवेल यांच्या ताब्यात देण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी चालकास वाहनासह रुग्णालयात रवाना करण्यात आले.

**दुसरी घटना :** त्याच ठिकाणी कर्तव्यावर असताना एमएच-०६-सीव्ही-४६०९ क्रमांकाच्या वाहनावरील चालकाकडून एका स्कुटीला धक्का लागल्याने एक इसम खाली पडून जखमी झाला. सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस नाईक विश्वनाथ पाटील व पोलीस शिपाई संजय घाडगे यांनी तात्काळ जखमीस रिक्षामधून पटवर्धन हॉस्पिटल येथे उपचारासाठी रवाना केले. संबंधित दुचाकी चालविणारी महिला देखील त्यांच्यासोबत होती.या दोन्ही घटनांमध्ये वाहतूक पोलिसांनी दाखविलेली तत्परता, मानवतावादी दृष्टिकोन आणि वेळेवर दिलेली मदत यामुळे जखमींना त्वरित उपचार मिळू शकले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी केलेल्या या कार्याचे उपस्थित नागरिकांनी मनापासून कौतुक केले.

# खांदा कॉलनीत शिवसेना युवा शाखेतर्फे स्वच्छता अभियान यशस्वीरित्या संपन्न !

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी** : आज शिवसेना-युवासेना खांदा कॉलनी शहर शाखेच्या वतीने खांदा कॉलनी येथील शिव मंदिर तलाव परिसरात भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तलावातील प्लास्टिक, कचरा व जलवनस्पती काढून परिसर स्वच्छ करण्यात आला.पर्यावरण संवर्धन आणि आपल्या परिसराच्या स्वच्छतेसाठी सर्व शिवसैनिक, युवासैनिक आणि स्थानिक नागरिकांनी दिलेले योगदान खरोखरच कौतुकास्पद होते. स्वच्छ तलाव म्हणजे निरोगी पर्यावरण आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित निसर्ग.या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक आणि नागरिकांचे शिवसेने तर्फे मनःपूर्वक आभार मानण्यात आले



# पालखी सोहळयासाठी सणसर ग्रामपंचायत सज्ज; वारकऱ्यांच्या सेवेसाठी व्यापक तयारी

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : सणसर,ता.इंदापूर संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळयाचा इंदापूर तालुक्यातील पहिला मुक्काम गुरुवारी सणसर येथे होत असून, लाखो वारकऱ्यांच्या स्वागतासाठी सणसर ग्रामपंचायतीने सर्वतोपरी तयारी पूर्ण केली आहे. वारकऱ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी निवारा, स्वच्छता, रस्ते, प्रकाश व्यवस्था, आरोग्य सुविधा आणि पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करण्यात आल्याची माहिती सरपंच यशवंत पाटील आणि ग्रामसेवक सचिन पवार यांनी दिली.

यंदाही गेल्या वर्षाप्रमाणे वारकऱ्यांच्या मुक्कामासाठी प्रशस्त जर्मन मंडप उभारण्यात आला असून, हजारो वारकऱ्यांना सुरक्षित व आरामदायी निवाऱ्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पालखी मार्गावरील तसेच गावातील प्रमुख रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले असून, संपूर्ण गावाची विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. त्यामुळे गाव परिसर स्वच्छ आणि आकर्षक दिसून येत आहे.

वारकऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गावातील अंतर्गत रस्ते तसेच वाडी-वस्त्यांकडे जाणाऱ्या मार्गांवर नवीन प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी मुरूम टाकून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली असून, खड्डेमुक्त व सुकर प्रवासासाठी आवश्यक कामे पूर्ण करण्यात आली आहेत. पालखी मार्गावरील सर्व व्यवस्था अंतिम टप्प्यात असून ग्रामपंचायतीचे कर्मचारी आणि स्थानिक नागरिक तयारीत व्यस्त असल्याचे चित्र आहे.वारकऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेत प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक औषधसाठा, वैद्यकीय पथक तसेच आपत्कालीन उपचारांची व्यवस्था करण्यात आली आहे.आरोग्य विभागही ग्रामपंचायतीच्या समन्वयाने कार्यरत असून, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने सेवा देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे."संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळयाला येणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला सुरक्षित, स्वच्छ आणि समाधानकारक सुविधा मिळाव्यात, यासाठी ग्रामपंचायतीने सर्व विभागांच्या सहकार्याने नियोजनबद्ध तयारी केली आहे. सेवाभावातून वारकऱ्यांचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण ग्रामस्थही उत्साहाने सहभागी झाले आहेत,"असे सरपंच यशवंत पाटील यांनी सांगितले.गुरुवारी होणाऱ्या पालखी मुक्कामाच्या पार्श्वभूमीवर सणसर गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले असून, वारकऱ्यांच्या स्वागतासाठी ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# माणिकनगरच्या श्री. सिद्धिविनायक वसतिगृहात विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील माणिकनगर (भवन) येथील महाराष्ट्र शासन राज्यस्तरीय 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार' प्राप्त श्री. सिद्धिविनायक मुलींचे वसतिगृह, सामाजिक न्याय विभागाच्या मान्यतेने कार्यरत आहे. या वसतिगृहातील विद्यार्थिनींची नुकतीच विशेष आरोग्य तपासणी करण्यात आली.अंधारी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अजिंक्य महालकर यांनी या वसतिगृहातील २५ विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी केली आणि त्यांना आवश्यक औषधोपचार दिले. याप्रसंगी डॉ. महालकर यांनी विद्यार्थिनींना वैयक्तिक आरोग्य आणि शारीरिक स्वच्छतेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.आरोग्य तपासणीनंतर डॉ. महालकर यांनी वसतिगृह इमारतीचा परिसर, पिण्याची पाण्याची व्यवस्था आणि निवास व्यवस्थेची पाहणी केली.



वसतिगृह परिसरात दिसून आलेली स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची साठवणूक करण्याची टाकी तसेच भोजन कक्षातील अन्नधान्याची पाहणी केली असता, सर्व व्यवस्था अत्यंत स्वच्छ आणि व्यवस्थित असल्याचे आढळून आले. याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या उपक्रमासाठी आरोग्य समुदाय अधिकारी डॉ. युसूफ शेख, आरोग्यसेविका मनिषा वाघ, आशा स्वयंसेविका मंगल पंडित (कानडे), करुणा जाधव आणि अलका पवार यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या अध्यक्षा कलावती बोराडे, संस्थापक सचिव सुनिल बोराडे, वसतिगृहाच्या अधीक्षिका मनीषा बिडवे, कर्मचारी कल्याणी वाघ, विद्या छडीदार यांच्यासह वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

# खांडवी येथील बूथ लेव्हल अधिकारी संतोष सानप यांचे उल्लेखनीय कार्य; कोतवाल व पोलीस पाटील यांची मोलाची साथ

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सध्या संपूर्ण राज्यात मतदार यादी विशेष पुनरिक्षण मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेत खांडवी येथील बूथ लेव्हल अधिकारी संतोष सानप यांनी उत्कृष्ट आणि आदर्शवत काम करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

मतदार यादीतील दुरुस्ती, नवीन मतदारांची नोंदणी, मृत व स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे तसेच दुबार नावे



कमी करणे यासाठी संतोष सानप हे गेल्या अनेक दिवसांपासून अहोरात्र मेहनत घेत आहेत.गावातील प्रत्येक वस्ती, वाडी आणि घरापर्यंत प्रत्यक्ष भेट देऊन ते मतदारांची मॅपिंग करून घेऊन माहिती पडताळत आहेत. वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या युवक-युवतींना मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी ते स्वतःहून मार्गदर्शन करत आहेत.

विशेष म्हणजे या राष्ट्रीय महत्त्वाच्या कामात त्यांना गावचे कोतवाल सुंदर जाधव आणि पोलीस पाटील कान्होजी साळवे यांची भक्कम साथ मिळत आहे. कोतवाल हे घरोघरी जाऊन नागरिकांना आवश्यक कागदपत्रांची माहिती देत आहेत, तर पोलीस पाटील हे लोकांमध्ये जनजागृती करून मतदार नोंदणी मोहीम यशस्वी करण्यासाठी माहिती देत आहेत.

# देवणीतील एसटी आरक्षण कायम ठेवण्याची मागणी

## आरक्षण रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी नगरपंचायतीतील अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाबाबत सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर आदिवासी कोळी जमात सामाजिक संघटनेने स्पष्ट भूमिका मांडत एसटी समाजाला अन्याय होऊ नये, अशी मागणी केली आहे.

यापूर्वी एका कुटुंबाबाबत करण्यात आलेल्या तक्रारीत संबंधित कुटुंबातील आई ओबीसी/एसबीसी प्रवर्गातून निवडून येऊन लातूर जिल्हा महिला बालकल्याण सभापती झाल्याचा, तर त्यांचा मुलगा अनुसूचित जमाती प्रवर्गातून विद्यमान नगरसेवक असल्याचा उल्लेख करण्यात आला होता. तसेच देवणी शहरात अनुसूचित जमातीची लोकसंख्या नसल्याचा दावा करून चौकशीची मागणी करण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर आदिवासी कोळी जमात सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रेणुकाचार्य खाणापुरे यांनी उपलब्ध जनगणना नोंदींचा दाखला देत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, 2011 च्या जनगणनेनुसार देवणी शहराची एकूण लोकसंख्या 12,899 असून, उपलब्ध नोंदींनुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या 586 आहे. म्हणजेच शहराच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे 4.54 टक्के लोकसंख्या अनुसूचित जमातीची असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यामुळे एका कुटुंबा विरोधातील तक्रारीच्या आधारे संपूर्ण अनुसूचित जमाती समाजाला वेठीस धरता येणार नाही. संबंधित प्रकरणाची चौकशी स्वतंत्रपणे व्हावी; मात्र त्याचा आधार घेत देवणी नगरपंचायतीतील अनुसूचित जमातीसाठी असलेले आरक्षण रद्द करण्यात येऊ नये, अशी ठाम मागणी संघटनेने केली आहे.

एसटी समाजाच्या घटनात्मक अधिकारांवर गदा आणण्याचा किंवा एसटी आरक्षण रद्द करण्याचा कोणताही प्रयत्न झाल्यास आदिवासी कोळी जमात सामाजिक संघटनेच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

यावेळी प्रा. रेणुकाचार्य खाणापुरे (संस्थापक अध्यक्ष, आदिवासी कोळी जमात सामाजिक संघटना, महाराष्ट्र), रोहित बोईनवाड (युवाध्यक्ष, मराठवाडा विभाग) आणि कृष्णा वच्चे (युवा जिल्हाप्रमुख, निलंगा-देवणी विभाग) यांनी संयुक्तपणे ही भूमिका जाहीर केली.

# दोन लाख 34 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** महानगर गॅसच्या ऑफिस मधून बोलत असल्याचे सांगून लिंक पाठवून ती लिंक ओपन केली असता दोन लाख 34 हजार रुपये इतर बँक खात्यात वळते करून घेण्यात आले. फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.प्रिन्स सिंग हे कळंबोली, रोडपाली येथे राहत असून त्यांच्या मोबाईल क्रमांकावर महानगर गॅस ऑफिस मधून बोलत असल्याचे सांगण्यात आले. यावेळी महानगर गॅसच्या कनेक्शनची जोडणी करण्यासाठी लिंक पाठवण्यात आली त्या लिंकला ओपन होण्यासाठी लागणारे वेगवेगळ्या परमिशन त्यांच्याकडून घेऊन दोन जुलै रोजी त्यांच्या बँक खात्यातून दोन लाख 34 हजार रुपये रक्कम इतर बँक खात्यात वळती करून घेऊन सिंग यांची फसवणूक करण्यात आली.

# जिल्हा परिषदेच्या शाळांचे पनवेल पालिकेकडे तातडीने हस्तांतरण करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : रायगड जिल्हा परिषदेकडून पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित होणाऱ्या प्राथमिक शाळांचे तातडीने हस्तांतरण करण्याची मागणी नगरसेवक डॉ. अरुणकुमार शंकर भगत यांनी पनवेलचे आयुक्त यांच्याकडे पत्राद्वारे केली.पनवेल पालिका हद्दीतील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. पालिका क्षेत्रात जिल्हा परिषदेचे 51 शाळा असून 7 हजार 754 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांमध्ये शाळांचे सध्याचे इमारत, वर्ग खोल्या, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, संरक्षण भिंत, वीज पुरवठा तसेच मूलभूत सुविधा अपुऱ्या आणि जीर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे या शाळांची स्थिती ना घर का, ना घाट का अशी झाली आहे. पालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित अबाधित राहण्याच्या दृष्टीने आणि त्यांच्या शिक्षणात कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येऊ नये यासाठी या शाळा महानगरपालिकेकडे तातडीने हस्तांतरित करून घेणे आवश्यक आहे. हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सीएसआर फंड आणि इतर निधीच्या माध्यमातून या शाळांची सुधारणा होऊ शकते. त्यामुळे या शाळांचे तातडीने हस्तांतरित करून घ्यावे अशी मागणी नगरसेवक डॉ. अरुणकुमार शंकर भगत यांनी केली आहे.

# गोखले रोडवरील बसस्टॉप पूर्ववत सुरू; विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई किशोर गुडेकर, विभागीय संपादक** : माहीम विधानसभा क्षेत्रातील गोखले रोडवरील बसस्टॉप अचानक बंद करण्यात आल्यामुळे परिसरातील शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. बसस्टॉप बंद झाल्याने नागरिकांना लांब अंतर पायी चालत जाऊन बस पकडावी लागत होती. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी याबाबत सातत्याने तक्रारी करून बसस्टॉप पूर्ववत सुरू करण्याची मागणी केली होती.





या मागणीची गंभीर दखल घेत रिया कीर यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या पुढाकारानंतर भारतीय जनता पक्षाच्या दक्षिण मुंबई जिल्हा महामंत्री सौ. अक्षता तेंडुलकर यांनी संबंधित विभागाशी सातत्याने पाठपुरावा करून प्रशासनाशी समन्वय साधला. दोघींच्या प्रयत्नांना यश मिळाल्यानंतर गोखले रोडवरील बसस्टॉप पूर्ववत सुरू करण्यात आला असून परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या कामासाठी महाराष्ट्राचे माहिती व तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आणि मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. ॲड. आशिष शेलार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच श्री. जितेंद्र राऊत, सचिव, श्री सिद्धिविनायक मंदिर न्यास व माहीम विधानसभा प्रभारी, यांच्या सहकार्यामुळेही हा प्रश्न मार्गी लागल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

बसस्टॉप पुन्हा सुरू झाल्यामुळे शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच रोज प्रवास करणाऱ्या नोकरदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. परिसरातील रहिवाशांनी रिया कीर, सौ. अक्षता तेंडुलकर तसेच सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानत, नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठी अशाच प्रकारे प्रशासनाने तत्परतेने कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

गोखले रोड परिसरातील नागरिकांनी विशेषतः रिया कीर यांच्या पुढाकाराचे तसेच सौ. अक्षता तेंडुलकर यांच्या तत्पर पाठपुराव्याचे कौतुक करत, नागरिकांच्या प्रश्नांबाबत त्यांनी दाखविलेली संवेदनशीलता आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. स्थानिक पातळीवरील प्रश्न वेळेत सोडविल्यास नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होतो, अशी प्रतिक्रिया यावेळी अनेक नागरिकांनी व्यक्त केली. बसस्टॉप पूर्ववत सुरू झाल्यामुळे परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ झाली असून दैनंदिन प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना त्याचा थेट लाभ होणार आहे.

## उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त 'आम्हाला गर्व हिंदुत्वाचा' ग्रुपतर्फे अनाथ,निराधारांना मदतीचा हात

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(केतन भोज)** : शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्त 'आम्हाला गर्व हिंदुत्वाचा' या व्हॉट्सॲप ग्रुपतर्फे सामाजिक बांधिलकी जपत ३२ वा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत तडवळे (जि. धाराशिव) येथील श्री गुरुदत्त बहुउद्देशीय संस्था या अनाथ,निराधार व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या आश्रमाला ५०० लिटर क्षमतेचा सोलार वॉटर हिटर भेट देण्यात आला. यावेळी आश्रमातील मुलांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन अन्नधान्य,कपडे, शालेय साहित्य तसेच लहान मुलांसाठी




खाऊचेही मोठ्या प्रमाणावर वाटप करण्यात आले.सोलार वॉटर हिटरचे उद्घाटन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) धाराशिव जिल्हा संघटिका सौ.शामल वडणे यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाला तडवळे ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ.स्वाती जमाले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या उपक्रमात 'आम्हाला गर्व हिंदुत्वाचा' व्हॉट्सॲप ग्रुपचे संस्थापक व संचालक संतोष पाटील यांच्यासह ग्रुप कमिटीचे सदस्य महेंद्र गुरव,सुरेश वाडकर,लवेश म्हात्रे,जितेंद्र पाभरेकर,भालचंद्र उकिर्डे,संपदा धोंगडे,संदीप गुरव,विलास चव्हाण,वासंती गोताड,सुजाता धारगळकर, सोनिया पाटील,दिलीप गावडे,अनिल कांबळे,अशोक कोळंबकर,दिनेश पाटील तसेच महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेले सुमारे ६० शिवसैनिक सदस्य उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आश्रमातील मुलांशी संवाद साधून त्यांना शिक्षण,संस्कार व स्वावलंबनाचे महत्त्व पटवून दिले.सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून अशा उपक्रमांद्वारे गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा संकल्पही व्यक्त करण्यात आला.

# राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदाचा ॲड.नरसिंह जाधव यांचा राजीनामा

**दैनिक युवक आधार**
**शेख महेशर ताहेर,पाटोदा (प्रतिनिधी)** - राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या कडे पाठविला असून त्याची प्रत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार आणि आमदार जयंत पाटील यांना ही पाठविली आहे. पाटोदा येथील रहिवासी असलेले ॲड.नरसिंह जाधव हे छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालय वकील संघाचे माजी अध्यक्ष आहेत. त्यांचे वडील कै.ॲड. लक्ष्मणराव जाधव हे बीड जिल्ह्यात शरद पवार यांचे निकटवर्तीय सहकारी म्हणून ओळखले जात होते. त्यांनी पाटोदा पंचायत समितीचे सभापती म्हणूनही काम पाहिले होते. तसेच ॲड.जाधव यांचे बंधू शिवभूषण जाधव यांनी २०१९ ते २०२५ या कालावधीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली होती. सन १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या



स्थापनेपासून ॲड.जाधव पक्षाशी निष्ठेने जोडलेले होते. बीड लोकसभा निवडणुका तसेच आष्टी विधानसभा मतदारसंघातील विविध निवडणुकांमध्ये पक्षाच्या उमेदवारांच्या विजयासाठी त्यांनी सक्रियपणे काम केले. जिल्हा परिषद सदस्यांच्या अपात्रतेसह विविध निवडणूक विषयक कायदेशीर बाबींमध्ये त्यांनी पक्षाची भक्कम बाजू न्यायालयात मांडली. राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक आणि कायदे विषयक कामातही ॲड.जाधव यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. मराठवाड्यातील अनेक जनहिताच्या प्रश्नांवर त्यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्या. नारेगाव कचरा डेपो, चिकलठाणा परिसरातील अतिक्रमण, नारायण पुष्प सोसायटी रस्ता, बीड जिल्ह्यातील मंदिर-मशीद जमीन प्रकरणे, पैठण–पंढरपूर पालखी मार्ग, मांजरा नदीवरील पुलाच्या कामातील अनियमितता तसेच अपात्र स्वातंत्र्यसैनिकांच्या प्रकरणांसह अनेक महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी न्यायालयीन लढा उभारला.

पाटोदा परिसरातील निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांविरोधात त्यांनी उपोषणही केले होते. त्या नंतर संबंधित ठेकेदाराला रस्त्याचे काम पुन्हा करावे लागले आहे. २०२४ मध्ये आष्टी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची तयारी केली होती. त्यासाठी त्यांनी मतदारसंघातील सुमारे २०० ते २५० गावांचा दौरा करून नागरिकांच्या समस्या जाणून घेत विविध प्रश्नांवर आवाज उठविला होता. आपल्या दीर्घ राजकीय प्रवासानंतर प्रदेश उपाध्यक्षपदाचा राजीनामा देत त्यांनी पक्षापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला आहे. आता ते पुढे कोणती राजकीय भूमिका स्वीकारणार, या कडे बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे.

# मातंग समाजाच्या महिलेच्या मारेकऱ्यास फाशी द्या; सिल्लोड तहसीलदारांना निवेदन

## महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांवर 'मोक्का' अंतर्गत कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सोलापूर जिल्ह्यातील मागासवर्गीय चौंडेश्वरवाडी या गावात शेतात काम करत असताना हिंदू मातंग समाजाच्या महिला शेतकरी उषा विजय साठे यांची सचिन देशमुख नावाच्या व्यक्तीने दिवसाढवळ्या गोळी झाडून हत्या केली. या जातीवादी आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी, तसेच मातंग समाजाचे महापुरुष वंदनीय लहुजी साळवे व वंदनीय साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्याबद्दल सोशल मीडियाच्या माध्यमातून वेळोवेळी वाईट बोलणाऱ्या समाजकंटक राजू थोटे आणि कपिल सरोदे यांच्यावर 'मोक्का' अंतर्गत तात्काळ कारवाई करून तडीपार करावे, या मागण्यांचे निवेदन सिल्लोड येथे सकल मातंग समाज आणि डॉ. अण्णाभाऊ साठे संघर्ष सेनेतर्फे तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले.

**•फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून १ कोटींची भरपाई द्या•**



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सोलापुरात घडलेली ही हत्या केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नसून, मागासवर्गीय समाजाविरुद्ध वाढत्या जातीय मानसिकतेचे गंभीर चित्र आहे. या प्रकरणातील दोषींवर 'अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत' (Atrocity Act) प्रभावी अंमलबजावणी करावी. पीडित कुटुंबांना तात्काळ न्याय मिळण्यासाठी हे प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवावे आणि शासनाच्या वतीने पीडित परिवारास १ कोटी रुपयांची आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी आग्रही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.


हे निवेदन देताना सकल मातंग समाजाचे अध्यक्ष साहेबराव दनके, अण्णाभाऊ साठे युवा मंचाचे अध्यक्ष डॉ. सचिन साबळे, लहुजी साळवे विकास परिषदेचे कार्याध्यक्ष संदीप मानकर, अण्णाभाऊ साठे संघर्ष सेनेचे प्रदेशाध्यक्ष राजू साठे, त्रिंबक शेजुळ, भारतीय वंचित जन संसद जिल्हाध्यक्ष तथा लाल बावटा कॉम्रेड शिवराम कांबळे, एकनाथ आगाम, शंकर पारदे, शिवदास दनके, विष्णू साळवे, संजय निकाळजे, लखन साठे, मधुकर साठे, सखाराम भिसे, विजय अग्रवाल, प्रमोद दनके, विष्णू सौदागर आणि मनोज दनके आदींसह बहुसंख्य समाजबांधव उपस्थित होते.

# भावली घटनेनंतर पर्यटनस्थळांची सुरक्षा धोक्यात; पोलिसांचा सतर्कतेचा इशारा

**नाशिक :** मागील आठवड्यात इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्यात दोन दिवस मुसळधार पाऊस कोसळला होता. ढगफुटीसदृश पावसाच्या अंदाजामुळे त्यावेळी पर्यटनस्थळे बंद करण्यात आली होती. त्यानंतर शनिवार व रविवारी परिसरातील धबधबे, गड-किल्ले आणि धरणांवर पर्यटकांचा अक्षरशः पूर आला होता. याच काळात भावली धरण व धबधबा परिसरात वादातून पर्यटकांवरील हल्ल्यामुळे पावसाळी पर्यटनस्थळांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सह्याद्रीच्या डोंगररांगांतील इगतपुरी हा धरणांचा तालुका म्हणून ओळखला जातो. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील या तालुक्यातून, विशेषतः कसारा घाटातून, पावसाळ्यात प्रवास करताना ढग जमिनीवर उतरल्याची अनुभूती मिळते. भावली धरण व धबधबा, वैतरणा, मुकणे अशी अनेक धरणे, घाटणदेवी तसेच डोंगर-दऱ्यांमधून खळाळत वाहणाऱ्या पाण्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी उसळते. परिसरातील गड-किल्ल्यांवरही अनेक जण भ्रमंतीसाठी येतात.

इगतपुरीप्रमाणेच त्र्यंबकेश्वर तालुक्यातील खोल दरीत उतरून जावे लागणारा दुगारवाडी धबधबा, पहीने परिसरातही अशीच परिस्थिती असते. डोंगर-दऱ्यांमध्ये दूरवर पसरलेल्या या पर्यटनस्थळांवर निसर्गाचा आनंद घेण्यासाठी आलेल्या पर्यटकांबरोबरच मद्यपानासाठी आलेल्या टवाळखोरांचीही मोठी गर्दी असते. अनेक ठिकाणी भ्रमणध्वनीला नेटवर्क नसल्याने काही विपरीत घडल्यास पोलीस



किंवा शासकीय यंत्रणांकडे मदत मागणे अवघड होते.

या भागातील अनेक हॉटेल्समध्ये अनधिकृतपणे मद्यविक्री केली जाते. टवाळखोर उघड्यावर मद्यपान करतात. वाहनांवर मोठ्या आवाजात गाणी लावून धांगडधिंगा घालतात. महिला व मुलींची छेड काढतात. त्यांना कोणी अटकाव करण्याचा प्रयत्न केल्यास वाद झाल्याच्या घटनाही घडतात. रविवारी भावली धरण परिसरात वादानंतर पाठलाग करून पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी ताब्यात घेतलेले नऊ संशयित हे बाहेरील नव्हे, तर स्थानिक परिसरातील गावांतील असल्याचे स्पष्ट झाले आहे. संशयितांनी एका महिलेची छेड काढल्यानंतर सुमारे १० ते १२ किलोमीटर पाठलाग करून पर्यटकांच्या वाहनावर हल्ला केला. या घटनेमुळे इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील पर्यटनस्थळांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याबाबत नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांनी इगतपुरी व त्र्यंबकेश्वरमधील सर्व पर्यटनस्थळे पर्यटकांसाठी सुरक्षित असल्याचा निर्वाळा दिला. सर्व पर्यटनस्थळांवर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येतो. भावली धरण परिसरात पोलीस चौकी असून, तेथे कायमस्वरूपी पॉइंट बंदोबस्तही असतो. रविवारीही तेथे बंदोबस्त होता. पर्यटनस्थळांकडे येणाऱ्या-जाणाऱ्या मार्गांवर नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली जाते. रविवारच्या घटनेत भावली धरण परिसरात सुरू झालेल्या वादाचे पर्यवसान सात ते आठ किलोमीटर अंतरावर झालेल्या हल्ल्यात झाले. पर्यटनस्थळांच्या परिसरातील अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स आणि मद्यपींवर यापूर्वीपासूनच कठोर कारवाई केली जात आहे. भावली धबधबा, धरण आणि पहीने परिसरातही मद्यपी व टवाळखोरांविरोधात नियमित कारवाई सुरू आहे.

भावलीच्या घटनेनंतर पर्यटनस्थळांवरील बंदोबस्तात आणखी वाढ करण्यात येणार आहे.

पर्यटकांनी घाबरण्याची गरज नाही. भावलीसारख्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी सर्वतोपरी खबरदारी घेतली जाईल, असे पोलीस अधीक्षक डॉ. स्वामी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# अकरावी प्रवेशासाठी १६ जुलैपासून पुढील फेरी; सुधारित वेळापत्रक जाहीर

**मुंबई :** अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत नियमित तीन फेऱ्या आणि विशेष दोन फेऱ्या पूर्ण झाल्यानंतरही प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी 16 जुलै पासून पुढील प्रवेश फेरीचे वेळापत्रक शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे. या फेरीत नवीन विद्यार्थ्यांना नोंदणी, अर्जातील दुरुस्ती आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या पसंतीक्रमाची नोंद करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जाहीर वेळापत्रकानुसार 16 जुलै दुपारी 3 वाजेपासून 18 जुलै सायंकाळी 6 वाजेपर्यंत नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, अर्जातील दुरुस्ती आणि भाग-2 भरण्याची प्रक्रिया सुरू राहणार आहे. विद्यार्थ्यांना किमान एक आणि कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविता येणार आहेत. या फेरीसाठी प्रवेश वाटप प्रक्रिया 19 जुलै रोजी पार पडणार असून 20 जुलै रोजी सकाळी 10 वाजता प्रवेश यादी आणि कट-ऑफ जाहीर करण्यात येणार आहेत. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना 20 जुलै ते 22 जुलै या कालावधीत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन कागदपत्र पडताळणी करून प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

त्यानंतर 23 जुलै रोजी माहिती प्रक्रिया करण्यात येऊन 24 जुलै रोजी दुपारी 1 वाजता रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध केली जाईल. राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावीचे वर्ग 15 जुलैपासून सुरू होत असल्याने विद्यार्थी आणि पालकांनी वेळापत्रकानुसार सर्व कार्यवाही वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याची दखल; कोमल मोहनिश भोईर यांना मानद डॉक्टरेट सन्मान

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी** : समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांच्या सेवेसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या कोमल मोहनिश भोईर यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत "व्हिजनरी डॉक्टरेट ऑनर इन सोशल वर्क" हा प्रतिष्ठेचा मानद डॉक्टरेट सन्मान प्रदान करण्यात आला.

विविध सामाजिक उपक्रमांद्वारे मानवतेची सेवा, समाजाप्रती असलेली निष्ठा आणि लोककल्याणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची नोंद घेऊन हा सन्मान बहाल करण्यात आला आहे.

कोमल मोहनिश भोईर यांनी अनेक वर्षांपासून गरजू कुटुंबांना मदतीचा हात देणे, पूरग्रस्तांना मदत, दिव्यांगांना व्हीलचेअर वाटप, आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलांना शैक्षणिक सहाय्य, महिलांसाठी आरोग्य जनजागृती उपक्रम तसेच वृद्धाश्रमांमध्ये सेवा अशा विविध सामाजिक कार्यातून समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे अनेक गरजूंच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आले असून, समाजहितासाठी केलेल्या या सातत्यपूर्ण कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत त्यांना हा मानाचा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना कोमल मोहनिश भोईर म्हणाल्या, "हा सन्मान माझ्यासाठी अभिमानाचा क्षण असून समाजासाठी अधिक जबाबदारीने आणि निःस्वार्थ भावनेने कार्य करण्याची प्रेरणा




देणारा आहे.

प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा माझा प्रयत्न यापुढेही कायम राहील."

त्यांच्या या यशाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

"समाजसेवा हीच खरी मानवसेवा" या विचाराने प्रेरित होऊन कोमल मोहनिश भोईर यांचे कार्य भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## पिंपळगाव बसवंत टोलनाक्यावर ५३५ किलो गांजा जप्त; १.१२ कोटींचा मुद्देमाल हस्तगत

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : नाशिक ग्रामीण पोलिसांनी अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत मोठे यश संपादन करत पिंपळगाव बसवंत टोलनाका परिसरात तब्बल ५३५ किलो गांजा जप्त केला आहे. या कारवाईत १ कोटी १२ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून एका संशयित तस्कराला अटक करण्यात आली आहे. निफाड तालुक्यातील अलीकडच्या काळातील ही सर्वात मोठ्या अंमली पदार्थविरोधी कारवायांपैकी एक मानली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १४ जुलै २०२६ रोजी पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना गुप्त माहिती मिळाली होती. नाशिककडून मालेगावच्या दिशेने जाणाऱ्या एमएच-०६-बीजी-१७७६ क्रमांकाच्या पिकअप वाहनातून मोठ्या प्रमाणात गांजाची तस्करी होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ पिंपळगाव टोलनाका परिसरात सापळा रचला.

संशयित वाहन टोलनाक्यावर आल्यानंतर पोलिसांनी ते अडवून कसून तपासणी केली. तपासणीदरम्यान



### गुरव यांच्या नेतृत्वाखाली पहिलीच मोठी कामगिरी

पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी नुकताच पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर अल्पावधीतच त्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अचूक गुप्त माहितीच्या आधारे नियोजनबद्ध कारवाई करत कोटींचा मुद्देमाल जप्त केला. त्यामुळे अंमली पदार्थांच्या तस्करांना मोठा दणका बसला असून या प्रकरणातून तस्करीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

वाहनात लपवून ठेवलेला ५३५ किलो गांजा आढळून आला. त्यानंतर वाहन चालक राहुल शांताराम पाटील (वय ३३, रा. मुटकी, ता. जि. धुळे) याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

या प्रकरणी पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २०१/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा कलम ८(क) व २०(ब)(ii)(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये ५३५ किलो गांजा, पिकअप वाहन, मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण १,१२,१४,००० रुपयांचा मुद्देमाल समाविष्ट आहे.

नाशिक ग्रामीण पोलीस दलाकडून अवैध व्यवसाय व अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात सातत्याने विशेष

### पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या नेतृत्वाखाली नाशिक ग्रामीण पोलिसांची धडक कारवाई; एक तस्कर अटकेत

मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमागे नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक (मालेगाव) तसेच अपर पोलीस अधीक्षक (नाशिक ग्रामीण) यांचे मार्गदर्शन लाभले.

या धडक कारवाईत पोलीस निरीक्षक गणेश गुरव, सहायक पोलीस निरीक्षक रोहिदास भोर, पोलीस उपनिरीक्षक चारोसकर, पोलीस अंमलदार प्रशांत उगले, पोलीस हवालदार शिंदे व निकम तसेच पोलीस शिपाई विकास वाळुंज यांनी मोलाची भूमिका बजावली.

या कारवाईमुळे निफाड तालुक्यासह नाशिक जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचा स्पष्ट संदेश गेला असून, अशा प्रकारच्या कारवाया आगामी काळातही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

## जनता दरबार'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; प्रलंबित प्रश्नांचा पाढा, तातडीच्या कार्यवाहीचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**उरण/ प्रतिनिधी** : उरण नगरपरिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'जनता दरबार' उपक्रमाला सोमवारी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील विविध प्रभागांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाणीपुरवठा, रस्ते, गटारे, स्वच्छता, आरोग्य, पथदिवे, अतिक्रमण, कचरा व्यवस्थापन, नालेसफाई तसेच इतर नागरी सुविधांशी संबंधित प्रलंबित प्रश्न थेट नगराध्यक्षा आणि संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडले.

उरण शहरातील अनेक समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित असून त्यांचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्याची भावना यावेळी नागरिकांनी व्यक्त केली. काही भागांमध्ये अपुरा पाणीपुरवठा, खराब रस्ते, पावसाळ्यात निर्माण होणारा जलभराव, उघडी गटारे, अस्वच्छता, वाढते अतिक्रमण आणि कचऱ्याची समस्या




याकडे नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. अनेक तक्रारी यापूर्वीही करण्यात आल्या होत्या, मात्र त्यावर अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याची खंतही उपस्थितांनी व्यक्त केली.

'तुमची समस्या, आमचे प्राधान्य' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात नागरिकांना आपल्या समस्या थेट मांडण्याची संधी मिळाली. त्यामुळे विविध विभागांशी संबंधित शेकडो तक्रारींची नोंद करण्यात आली. काही प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांना जागेवरच सूचना देण्यात आल्या, तर उर्वरित प्रश्नांवर नियमानुसार आणि टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

नगराध्यक्षा सौ. भावना घाणेकर यांनी नागरिकांच्या प्रत्येक तक्रारीची गांभीर्याने दखल घेत, शहरातील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी नगरपरिषद कटिबद्ध असल्याचे सांगितले. नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांचे बारकाईने परीक्षण करून प्राधान्यक्रमाने त्यांचे निराकरण करण्यात येईल. काही प्रश्न तात्काळ सोडविण्यात आले असून उर्वरित कामांसाठी संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी उपस्थित नागरिकांनी अशा प्रकारचे जनता दरबार नियमितपणे आयोजित करण्याची मागणी केली. नागरिक आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद झाल्यास अनेक प्रश्न वेगाने मार्गी लागू शकतात, असे मतही अनेकांनी व्यक्त केले. दरम्यान, जनता दरबारात मोठ्या प्रमाणावर आलेल्या तक्रारींमुळे उरण शहरातील मूलभूत नागरी सुविधांसंदर्भातील अनेक प्रश्न अजूनही प्रलंबित असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. त्यामुळे आता जनता दरबारात दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत आणि किती वेगाने होते, याकडे संपूर्ण उरणकरांचे लक्ष लागले आहे.

## नवनिर्वाचित बँक संचालक प्रभाकर आबा काळे सन्मान, सेवानिवृत्त युवराज काळे यांच्या गौरव....

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेत नवनिर्वाचित छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रभाकर आबा काळे यांचा गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला.याच कार्यक्रमात सोयगाव विविध कार्यकारी सोसायटी संस्थेचे दीर्घकाळ सचिव म्हणून यशस्वीपणे कार्य करून सेवानिवृत्त झालेले सेवानिवृत्त युवराज पंडितराव काळे यांना भावपूर्ण सत्कार करण्यात आला. त्यांच्या उल्लेखनीय सेवेला मानवंदना अर्पण करण्यात आली.तसेच संस्थेचे नवनियुक्त सचिव दिलीप रावणे यांचेही सर्व संचालकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी प्रभाकर आबा काळे यांची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी झालेली निवड ही सोयगाव तालुक्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. त्यांच्या अनुभवाचा लाभ सहकार क्षेत्राला आणि

विशेषतःशेतकरी बांधवांना होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त सचिव युवराज पंडितराव काळे यांच्या सुमारे १२ ते १३ वर्षांच्या सेवाकार्यातील योगदानाचा विशेष गौरव करण्यात आला.आपल्या कार्यकाळात त्यांनी



प्रामाणिकपणा,पारदर्शकता आणि कर्तव्यनिष्ठा जपत संस्थेची जबाबदारी सक्षमपणे सांभाळली.शेतकरी बांधवांना कर्जमाफी, पीक कर्ज, विविध शासकीय योजना तसेच सहकारी संस्थेमार्फत उपलब्ध होणाऱ्या सुविधांचा लाभ वेळेत मिळावा यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. प्रत्येक शेतकऱ्याला योजनांची माहिती मिळून त्याचा प्रत्यक्ष लाभ व्हावा,यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला.युवराज काळे यांचा मनमिळाव,संयमी आणि सर्वांना आपलेसे करणारा स्वभाव हा त्यांच्या कार्याची मोठी जमेची बाजू ठरला.त्यामुळे शेतकरी,सभासद, कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांमध्ये त्यांनी विश्वासाचे नाते निर्माण केले.त्यांच्या कार्यामुळे संस्थेच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान मिळाल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

कार्यक्रमात नवनियुक्त सचिव दिलीप रावणे यांचे स्वागत करून त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. संस्थेची प्रगती,शेतकरी हित आणि सहकाराची परंपरा अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.या सत्कार समारंभास संस्थेचे चेअरमन मोतीराम नारायण पंडित,व्हा. चेअरमन मेरलाल झामु चव्हाण,संचालक प्रभाकर दयाळराव काळे, शांताराम दयाराम चौधरी, वामन महादू जावळे,एकनाथ नारायण गव्हाड,महंमद खा मनवरखा पठाण,जितेंद्र कृष्णा चौधरी,रमेश त्र्यंबक गव्हांडे,भिला हरी राठोड,भरत देवराव इंगळे संचालिका सौ. मिराबाई रमेश पाटील (काळे)सौ.सागरीबाई जोगी राठोड, मध्यवर्ती बँकेचे व्यवस्थापक अमोल पाटील, कर्मचारी नाना काळे आदींची उपस्थिती होती.सभासद, शेतकरी बांधव तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला.

## जालना येथे माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीच्या राज्य कार्यकारिणीची घोषणा

### नांदेड जिल्हाध्यक्षपदी पत्रकार देविदास सोमाजी एंगडे, हिंगोली व परभणीतील नव्या नियुक्त्याही जाहीर'

**दैनिक युवक आधार**

**गंगाधर कदम अर्धापूर ग्रामीण तालुका प्रतिनिधी** : माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय महामेळावा जालना येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या भव्य सोहळ्यास राज्यभरातील पदाधिकारी, पत्रकार व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नांदेड, हिंगोली व परभणी जिल्ह्यांतील विविध पदांवर नव्या नियुक्त्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली.

नवीन नियुक्त्यांमध्ये पत्रकार देविदास सोमाजी एंगडे यांची नांदेड जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच पत्रकार शक्तिसिंह रामसिंह विदेह यांची नांदेड शहर सहसंघटक, पत्रकार गजानन सूर्यकांतराव माने यांची नांदेड शहर उपाध्यक्ष, पत्रकार दिग्विजय उत्तमराव थोरवटे यांची नांदेड तालुका सहसंपर्कप्रमुख, पत्रकार विठ्ठल साहेबराव देसाई यांची पूर्णा तालुका संघटक (परभणी), पत्रकार राहुल सोमाजी मगरे यांची वसमत तालुका संघटक (हिंगोली)




तसेच पत्रकार दीपक जनार्धन मुंढे यांची कळमनुरी तालुका संघटक (हिंगोली) म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे राज्याध्यक्ष महेश सारणीकर उपस्थित होते. त्यांनी नव्याने नियुक्त झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत पत्रकारांचे हक्क, संरक्षण, संघटन बळकटी आणि सामाजिक बांधिलकी अधिक प्रभावीपणे जोपासण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.यावेळी राज्यभरात समितीच्या कार्याचा प्रचार-प्रसार, संघटनवाढ आणि पदाधिकारी जोडणीसाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

या सोहळ्यास महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष सखाराम कुलकर्णी, मराठवाडा विभागीय अध्यक्ष राजू शिंदे, मराठवाडा विभागीय कार्याध्यक्ष ओमप्रकाश पत्रे, मराठवाडा विभागीय सचिव गणेश सवने, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष रमेश सुरशे, काशिनाथ भालेराव, उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्याध्यक्ष समाधान पाटील, विदर्भ विभागीय महिला संघटक सौ. ज्योत्स्ना करवाडे, पुणे जिल्हाध्यक्ष विकास क्षत्रिय, मुंबई जिल्हाध्यक्ष किशोर गुडेकर, नाशिक ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष शैलेश मालपुरे, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष रमेश केदारे, बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष सुरेश धारे, जालना जिल्हा उपाध्यक्ष अशोक म्हस्के, जालना जिल्हा संपर्कप्रमुख निवृत्ती गायके, भंडारा जिल्हा उपाध्यक्ष अमृतलाल चरडे, यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष राजेश पांडे, लातूर जिल्हा सचिव मंगेश चिंचोलीकर, छत्रपती संभाजीनगर जिल्हा समन्वयक डॉ. युवराज साळवे, पाथर्डी तालुका अध्यक्ष नवनाथ जिवडे, छत्रपती संभाजीनगर तालुका कार्यकारिणी सदस्य विलास कुलकर्णी, अर्धापूर तालुका अध्यक्ष राजेश्वर देशमुख, अर्धापूर तालुका संघटक तानाजी मेटकर, समिती सदस्य आरेफ पिंजारी, अर्धापूर ग्रामीण तालुका संघटक गंगाधर संजयराव कदम, मंठा तालुका कार्यकारिणी सदस्य अमोल जोशी, महादेव सुरशे, पैठण तालुका अध्यक्ष ऋषिकेश सुरशे, छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रसिद्धीप्रमुख तसेच राज्यभरातील अनेक पदाधिकारी, पत्रकार व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नांदेड येथे विश्वकर्मा पांचाळ समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार

**दैनिक युवक आधार**

**नांदेड / प्रतिनिधी अरविंद पांचाळ** : विश्वकर्मा सेवा संघ, नांदेड यांच्या वतीने रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, गुरुगोविंदसिंहजी स्टेडियम, नांदेड येथे विश्वकर्मा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास नांदेड जिल्ह्यातील सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी देगलूर येथील उद्योजक तथा माजी नगरसेवक दिपक शहाणे हे राहणार असून, उद्घाटक म्हणून जीएसटी विभागाचे डेप्युटी कमिशनर निलेश शेवाळकर उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी, साहित्यिक देविदास फुलारी, मुदखेड नगरपालिकेच्या नगरसेविका सौ. प्रेमलाबाई गोपीनाथराव पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

विश्वकर्मा सेवा संघ, नांदेडतर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणारा हा सत्कार सोहळा यंदा अकराव्या वर्षात पदार्पण करीत आहे. समाजातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात अधिकाधिक प्रगती करावी, स्पर्धेच्या युगात आपले वेगळे स्थान निर्माण करावे आणि गुणवंत विद्यार्थ्यांना योग्य प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमात दहावी व बारावी परीक्षेत ७० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा, तसेच वैद्यकीय प्रवेश परीक्षेत (NEET) ५०० पेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा आणि JEE व CET परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार असून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना विशेष पारितोषिकेही प्रदान करण्यात येतील.

याशिवाय समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'समाजभूषण' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तसेच प्रतिकूल परिस्थितीत आपल्या पाल्यांना उच्च शिक्षण देऊन यशस्वी घडविणाऱ्या मातांचा 'हिरकणी पुरस्कार' देऊन विशेष सन्मान केला जाणार आहे.

विश्वकर्मा सेवा संघाच्या या समाजोपयोगी उपक्रमाला समाजबांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, गुणवंत विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवावे आणि समाजाच्या प्रगतीच्या या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन विश्वकर्मा सेवा संघ, जिल्हा नांदेडच्या वतीने करण्यात आले आहे.

# साई ट्रस्ट संचालित जेएनपीए प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयात इयत्ता चौथी आणि सातवीच्या स्कॉलरशिप परीक्षेच्या अभ्यास वर्गाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** मंगळवार दिनांक 14 जुलै 2026 रोजी स्कॉलरशिप परीक्षेच्या उज्वल निकालाची परंपरा असलेल्या साई ट्रस्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयात इयत्ता चौथी आणि इयत्ता सातवीच्या स्कॉलरशिप अभ्यास वर्गाचे उद्घाटन साई ट्रस्टचे अध्यक्ष सन्माननीय श्री नरसू पाटील सर यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी शाळेचे प्रशासकीय अधिकारी आदरणीय श्री रमाकांत गावंड सर माध्यमिक विभाग मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक माननीय श्री गिरीश पाटील सर, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक माननीय श्री भूषण जाधव सर, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक माननीय श्री अंकुश जोगळे सर, बालोद्यान विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वैशाली बोरचटे आणि इयत्ता चौथी व सातवी चे स्कॉलरशिप विषय शिक्षक उपस्थित होते.

यावेळी शाळेचे *प्रशासकीय अधिकारी आदरणीय श्री रमाकांत गावंड सर माध्यमिक विभाग मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक माननीय श्री गिरीश पाटील सर, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक माननीय श्री भूषण जाधव सर, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक माननीय श्री अंकुश जोगळे सर, बालोद्यान विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वैशाली बोरचटे आणि इयत्ता चौथी व सातवी चे स्कॉलरशिप विषय शिक्षक उपस्थित होते.

सदर स्कॉलरशिप अभ्यास वर्ग शाळेच्या वेळा व्यतिरिक्त 1 तास अगोदर येऊन शिक्षक स्वतःचा जादा वेळ देऊन घेणार आहेत. अशाच प्रकारे इयत्ता दहावीचे इंग्रजी आणि मराठी माध्यमाचे शिक्षक अभ्यास वर्ग शाळेच्या वेळा व्यतिरिक्त 1 तास अगोदर येऊन घेत आहेत. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये प्रचंड उत्साह आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी *संस्थेचे* *अध्यक्ष सन्माननीय श्री नरसू पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही असे सांगताना स्कॉलरशिप मिळवण्यासाठी ध्येयवेडे व्हा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. येथील गुणवत्तावान शिक्षक शालेय वेळेव्यतिरिक्त वेळेत आपणाला मार्गदर्शन करणार आहेत त्याचा जास्तीत जास्त लाभ आपण घ्यावा असे म्हटले. तर शाळेचे *प्रशासकीय अधिकारी आदरणीय श्री रमाकांत गावंड सर यांनी




विद्यार्थ्यांनी अधिकाधिक मेहनत घेऊन रायगड जिल्ह्यात अधिकाधिक स्कॉलरशिप मिळवण्याचा मान मिळवून साई ट्रस्टचे नाव मोठं करावं अशी शुभेच्छा देताना सर्व स्कॉलरशिप शिकवणाऱ्या गुणी शिक्षकांचे कौतुक केले. मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री गिरीश पाटील सर यांनी स्कॉलरशिप परीक्षेत सर्वोत्कृष्ट गुण मिळवणारा विद्यार्थी शाळेच्या झेंडावंदनाचा मानकरी होईल. शाळेच्या वतीने हा मान विद्यार्थ्यांना दिला जातो ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने भाग्याची गोष्ट आहे. त्यामुळे सर्वोत्कृष्ट गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची शाळेच्या इतिहासात नोंद होईल अशी प्रेरणा विद्यार्थ्यांना दिली. इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री अंकुश जोगळे सर यांनी आपल्या शाळेने सर्वाधिक स्कॉलरशिप आणण्याचा विक्रम करावा आणि साई ट्रस्ट चे नाव मोठे करावे असे म्हटले. बालोद्यान विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वैशाली बोरचटे* यांनी सर्व विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळवून आपल्या आई वडिलांचे आणि शाळेचे नाव मोठे करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्कॉलरशिप तज्ञ मार्गदर्शिका श्रीमती योगसाधना पाटील मॅडम यांनी केले स्कॉलरशिप मार्गदर्शक म्हणूनसदरचे शिक्षक मार्गदर्शन करणार आहेत प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.4थी मराठी माध्यम) विषयाप्रमाणे मार्गदर्शक; शिक्षक गणित-श्रीम.प्रेरणा कदम,मराठी-श्रीमती योगसाधना पाटील, बुद्धीमत्ता चाचणी-श्री. रमाकांत गावंड, राजश्री शिवकर (2) प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा( इयत्ता चौथी इंग्रजी माध्यम) विषयाप्रमाणे मार्गदर्शक शिक्षक इंग्रजी..श्रीमती वंदना कपूर, गणित श्रीमती सचिता वाघवले, मराठी श्रीमती उज्वला तांडेल, बुद्धिमत्ता श्रीमती सारिका तायडे, सहाय्यक शिक्षिका श्रीमती प्रतीक्षा बंडा. माध्यमिक विभाग शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता सातवी मराठी माध्यम विषयाप्रमाणे मार्गदर्शक शिक्षक, इंग्रजी श्री राजेंद्र ठाकूर, मराठी श्रीमती सरोज भामरे, बुद्धिमत्ता श्रीमती प्रमिला पवार, गणित श्रीमती दिपाली अहिरे; माध्यमिक विभाग शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता सातवी इंग्रजी माध्यम विषयाप्रमाणे मार्गदर्शक शिक्षक;

# शुल्क आकारणी बाबत फलक न लावणाऱ्या शाळयांच्या मान्यता रद्द करा

## शिवसेनेची जिल्हाधिकाऱ्यांसह प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकारी यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी सय्यद इसा** : खासगी शाळान कडून पालकांची होत असलेली आर्थिक लूट थांबवण्यासाठी म्हणून आपल्या पाल्यांची वार्षिक क्षणिक व इतर शुल्क शाळेकडून आकारणी किती केली गेली आहे.याची माहिती देणे बंधन कारक असतांना देखील जाणीव पूर्वक फलक न लावणाऱ्या खाजगी शाळांवर शुल्का ची माहिती सार्वजनिक नकेल्या मुळे शुल्का बाबतची माहिती लपवल्या बदल प्रती दिवस एक लाखाचा दंड आकारणी करून शुल्क नियामक मंडळाच्या नियमाचा भंग केल्या प्रकरणी दोषी असलेल्या शाळांची मान्यता रद्द करण्यात यावी असे निवेदन शिवसेनेच्या वतीने देण्यात आले आहे

जिल्हाधिकारी यांच्या आदेश क्र. 4142 दि. 25/06/2026 नुसार सर्व खाजगी शाळांनी प्रवेशद्वारावर "फी आकारणी फलक" लावणे बंधनकारक असतानाही अनेक शाळा आदेशाला केराची टोपली दाखवत असल्याचा आरोप शिवसेनेचे जिल्हा प्रमुख विवेक देशमुक व जिल्हा सह संपर्क प्रमुख रवि उत्तमराव



राठोड यांनी केला आहे.

जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्कनियमन अधिनियम कलम 20 नुसार पालकांना फी ची माहिती पारदर्शकपणे देणे आवश्यक आहे. त्यासाठी शाळेने "शुल्क (फी )किती आहे" हा फलक लावणे बंधनकारक आहे.

दि. 06/07/2026 रोजी शिक्षणाधिकारी यांनी सर्व शाळांना याबाबत स्मरणपत्रही दिले. मात्र 10 दिवस उलटूनही अनेक शाळांनी अद्याप फलक लावले नाहीत.

**शिवसेनेच्या तीन प्रमुख मागण्या...**

१) सात दिवसात तपासणी :-सर्व खाजगी शाळांची तपासणी करून फलक न लावणाऱ्या शाळांची यादी प्रसिद्ध करावी.

२) एक लाखाचा दंड :-आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कलम 20 नुसार दररोज एक लाख रु. प्रमाणे दंडात्मक रक्कम वसूल करावी.

३) मान्यता रद्द :- दंड न भरणाऱ्या शाळांची मान्यता/अनुदान तात्काळ स्थगित करावे.आम्ही फक्त पारदर्शकता मागतोय. पालकांना आपल्या पाल्यांची शुल्क (फी)किती आहे हे सुद्धा सांगायला शाळा घाबरत आहेत का ? असा सवाल जिल्हा प्रमुख श्री.विवेक देशमुक व जिल्हा सह संपर्क प्रमुख श्री.रविभाऊ राठोड यांनी केला आहे. सात दिवसात कारवाईचा अहवाल न दिल्यास शिवसेनेच्या वतीने विषयाचा पूर्ण पणे पाठपुराव करण्यात येईल असे श्री. विवेक देशमुख जिल्हा प्रमुख,रविभाऊ राठोड जिल्हा सहसंपर्क प्रमुख,शंभाराव मामा लांडगे हिंगोली लोकसभा सह संपर्क प्रमुख,सुदर्शन नाईक तालुका प्रमुख माहूर.आदि निवेदन देतानी उपस्थित होते.

### झिरपूरवाडीतील मुक्त वसाहत योजनेत गंभीर अनियमितता

# प्रभारी सरपंच, लाभार्थी व अभियंत्याला नोटीसा; निधी उचलण्याचा ठपक्यासह रक्कम वसुलीचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर** : तालुक्यातील मौजा झिरपूरवाडी येथील यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतील कथित अनियमिततेप्रकरणी दिग्रस पंचायत समितीने मोठी कारवाई सुरू केली आहे. चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारे संबंधित लाभार्थी, तत्कालीन प्रभारी सरपंच, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता आणि ग्राम रोजगारसेवक यांना नोटीसा बजावण्यात आली असून समाधानकारक खुलासा न केल्यास फौजदारी कारवाई, शासनाचा निधी परत वसूल करणे आणि पुढील शासकीय लाभांपासून वंचित ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे. दिग्रस पंचायत समितीने बजावलेल्या नोटिसानुसार, रूपेश दादाराव राठोड यांनी दि. १ जानेवारी २०२६ रोजी केलेल्या तक्रारीनंतर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, यवतमाळ यांनी या प्रकरणाची चौकशी केली. सहाय्यक प्रकल्प संचालक व समिती अध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली चौकशी करण्यात आली. त्यानंतर प्रकल्प संचालकांनी चौकशी अहवालानुसार दोषींवर कारवाईचे निर्देश दिले.


चौकशीत घरकुलाच्या तिसऱ्या हप्त्यासाठी आवश्यक असलेले जिओ-टॅगिंग संबंधित लाभार्थ्याच्या घराऐवजी दुसऱ्या लाभार्थ्याच्या घरावर करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच प्रस्तावासोबत अन्य लाभार्थ्याच्या घरबांधकामाचा फोटो जोडून सादर करण्यात आल्याचा गंभीर ठपका ठेवण्यात आला आहे. नोटिशीत तत्कालीन प्रभारी सरपंच, तत्कालीन ग्रामसेवक आणि लाभार्थी यांनी संगनमत करून शासनाची दिशाभूल केल्याचे नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यास दिलेल्या नोटिशीतही, तिसऱ्या हप्त्याचे जिओ-टॅगिंग अन्य लाभार्थ्याच्या घरावर झाल्याचे असूनही त्याकडे दुर्लक्ष झाल्याने शासनाची दिशाभूल व निधीच्या अपहारास कारणीभूत ठरल्याचा आरोप करण्यात आला आहे. तर तत्कालीन प्रभारी सरपंचाला दिलेल्या नोटिशीत, लाभार्थ्याच्या प्रस्तावासोबत दुसऱ्या लाभार्थ्याचा फोटो जोडलेल्या प्रस्तावावर स्वाक्षरी करून तो सादर केल्यामुळे गैरव्यवहारास सहकार्य केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

नोटिसानुसार घरकुल बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यानुसार प्रत्यक्ष काम पूर्ण होणे आवश्यक असताना तसे झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे शासनाच्या निधीचा अपहार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. गटविकास अधिकारी, पंचायत समिती दिग्रस यांनी संबंधितांना तीन दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास फौजदारी स्वरूपाची कारवाई, शासनाकडून वितरित रकमेची वसुली आणि संबंधितांना पुढील कोणत्याही शासकीय लाभापासून वंचित ठेवण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल, असे नोटिशीत स्पष्ट करण्यात आले आहे. झिरपूरवाडीतील या प्रकरणामुळे ग्रामीण भागातील घरकुल योजनांच्या अंमलबजावणीतील पारदर्शकता, जिओ- टॅगिंग प्रणालीचा वापर आणि शासकीय निधीच्या नियंत्रणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. चौकशी अहवालानंतर प्रशासनाने उचललेल्या या पावलामुळे संपूर्ण तालुक्याचे लक्ष आता या प्रकरणातील पुढील कारवाईकडे लागले आहे.

# "आषाढी वारीच्या निमित्ताने येणाऱ्या पालख्या दिंडी सोहळे यांच्यासाठी पिलीव नगरी नियोजन मीटिंग सह सज्ज"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी( रघुनाथ देवकर):**जगाचे दैवत श्री विठ्ठल रुक्मिणी माता यांच्या दर्शनासाठी अनेक साधुसंत, महाराज महंत यांचे दिंडी सोहळे पालखी सोहळे" देव शयनी आषाढी एकादशीचे" औचित्य साधून पंढरपूर नगरीकडे प्रस्थान करीत असतात. त्याप्रमाणेच माळशिरस तालुक्यातील पिलीव या ऐतिहासिक गावावरून टाळ मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा तुकाराम च्या जयघोषा मध्ये तल्लीन होऊन पंढरपूर कडे जात असतात. याची दक्षता घेऊन




पिलीव ग्रामपंचायत च्या वतीने प्रशासक सरवदे, व ग्रामपंचायत अधिकारी भंडलकर भाऊसाहेब यांनी नियोजन मीटिंग चे आयोजन केले होते. या मिटींगला प्राथमिक आरोग्य केंद्र पिलीव पोलीस स्टेशन पिलीव कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, जवाहरलाल शेतकी विद्यालय जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, महसूल विभाग, महावितरण, तरुण मंडळे, विविध संघटना, व्यापारी संघटना त्याचप्रमाणे ज्यांच्याकडे दिंडी सोहळा व पालख्यांच्या प्रसादाची सोय असते असे भाविक भक्त यांना ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून स्वच्छतेच्या व इतर सूचना देऊन उपस्थितांना आरोग्य दिवाबत्ती इतर सेवा सुविधेच्या बाबतीत चर्चा करून याबाबत सर्वांनी दक्ष राहून दिंड्या , पालखी सोहळे यांना सेवा पुरवण्याबाबत जबाबदारीने कर्तव्य पार पाडण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. या मीटिंगच्या नियोजनासाठी लेखनिक सोमनाथ देशमुख, संगणक ऑपरेटर दीपक केसकर, विजय देशमुख व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जमिनीच्या वादातून कुऱ्हाडीने हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील आधारवाडी येथे सामाईक जागेच्या मालकी हक्कावरून सुरू असलेल्या वादातून आयोजित तडजोड बैठकीत वाद विकोपाला गेल्याने एकावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला करण्यात आला. मंगळवारी (१४ जुलै ) सकाळी ८ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आधारवाडी येथे जमिनीचा वाद मिटवण्यासाठी दोन्ही पक्षांची तडजोड बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, बैठकीदरम्यान वाद वाढल्याने आरोपींनी फिर्यादी आणि त्यांच्या मुलाला शिवीगाळ करत मारहाण सुरू केली. यावेळी आरोपी बाबूराव नागू शिंदे याने हातातील कुऱ्हाडीने फिर्यादीचा मुलगा भीमराव शिंदे यांच्या नाक व तोंडावर वार करून गंभीर जखमी केले. तसेच, इतर आरोपींनी लाकडी काठ्यांनी मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी गेलेले फिर्यादी बाबूराव तान्हेराम शिंदे (वय ७५) आणि त्यांच्या भावालाही आरोपींनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

याप्रकरणी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात बाबूराव नागू शिंदे, सोमनाथ बाबूराव शिंदे, विष्णू बाबूराव शिंदे आणि कांताबाई बाबूराव शिंदे (सर्व रा. आधारवाडी, ता. सिल्लोड) या चौघांविरुद्ध अश्लील शिवीगाळ करणे, मारहाण करणे व जिवे मारण्याची धमकी देणे अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.

# महागाव पोलिसांची धडक कार्यवाही;जुगार अड्ड्यावर छापे; अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव (यवतमाळ)** : महागाव पोलीस ठाण्याच्या पथकाने तालुक्यात अवैध धंद्यांविरोधात धडक मोहीम राबवत दोन ठिकाणी सुरू असलेले ५२ ताश पत्त्यांचे जुगार अड्डे उद्ध्वस्त केले, तर धनोडा येथे अवैधरित्या रेतीची वाहतूक करणारा ट्रॅक्टर-ट्रॉली जप्त केली. या तीन स्वतंत्र कारवायांत एकूण ६ लाख ७१ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी खडका फाटा येथील जंगल परिसरात छापा टाकला. तेथे सुरू असलेल्या ५२ ताश पत्त्यांच्या जुगारावर कारवाई करत पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत डावावरील रोख रक्कम, जुगाराचे साहित्य व इतर मुद्देमालासह १ लाख ३६ हजार ७८० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. या प्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७६/२०२६ नोंदविण्यात आला आहे. यानंतर पोलिसांनी मुडाणा येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ लगत परिसरात दुसऱ्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा २८ हजार ७३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गुन्हा क्रमांक ३७७/२०२६ महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अंतर्गत नोंदविण्यात आला आहे. दरम्यान, धनोडा येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील पुलावरून एक ट्रॅक्टर-ट्रॉली विनापरवाना अवैध रेतीची वाहतूक करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने सापळा रचून वाहन ताब्यात घेतले. या कारवाईत एक ब्रास रेती व ट्रॅक्टर-ट्रॉलीसह ५ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७८/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) अन्वये नोंदविण्यात आला आहे. या सर्व कारवाया पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि. प्रसेनजीत जाधव, पोहेकॉ. कैलास नेवकर, पोहेकॉ. केशव चव्हाण, पोहेकॉ. वसीम शेख, नापोकॉ. सुनील माथने, पोशि. सुनील जाधव व पोशि. संदीप तलांडे यांनी या कारवायांमध्ये सहभाग घेतला.

# वाहतूक कोंडी, बुलेटचा आवाज आणि महाविद्यालयीन सुरक्षा पोलीस प्रशासनाला निवेदन

**दैनिक युवक आधार:**

**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी :सय्यद इसा** : माहूर शहरातील बुलेट दुचाकींच्या कर्णकर्कश आवाजामुळे नागरिकांना होणारा त्रास तात्काळ थांबविण्यात यावा, शहरातील प्रत्येक महाविद्यालय परिसरात पोलीस गस्त वाढवावी तसेच आठवडी बाजाराच्या दिवशी मुख्य रस्त्यावरील अनधिकृत अतिक्रमण हटवून वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, माहूर तालुका यांच्या वतीने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, शहरात काही बुलेट दुचाकींमध्ये सायलेंसरमध्ये बदल करून मोठ्या आवाजात वाहन चालविले जात असल्याने सर्वसामान्य



नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अशा वाहनांवर विशेष मोहीम राबवून कठोर कारवाई करण्यात यावी.

तसेच शहरातील विविध महाविद्यालय परिसरात छेडछाड व टवाळखोरीच्या घटना टाळण्यासाठी नियमित पोलीस गस्त ठेवण्याची मागणीही करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, दर सोमवारी भरणाऱ्या आठवडी बाजाराच्या दिवशी मुख्य रस्त्यावर होणाऱ्या अनधिकृत अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असून नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

त्यामुळे संबंधित अतिक्रमण तातडीने हटवून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली.

हे निवेदन निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, माहूर तालुका यांच्या वतीने सादर करण्यात आले असून, पोलीस प्रशासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# 91 वर्षीय प्रकल्पग्रस्तांसह ग्रामस्थ 16 जुलैपासून आमरण उपोषणावर; प्रशासनाला जबाबदार धरण्याचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरण पंचायत समितीच्या कथित मनमानी, एकतर्फी आणि अन्यायकारक कारभाराविरोधात हनुमान कोळीवाडा येथील ग्रामस्थांनी संघर्षाची भूमिका घेतली असून,91 वर्षीय प्रकल्पग्रस्त अनंत रामजीवन परदेशी यांच्यासह ग्रामस्थ आणि रविंद्र अनंत कोळी हे गुरुवार, 16जुलै 2026 रोजी सकाळी 10 वाजल्यापासून उरण पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहेत. या आंदोलनामुळे उरण तालुक्यातील प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, विविध कर्मचारी संघटना, सामाजिक संघटना तसेच राजकीय पक्षांनी या उपोषणाला जाहीर पाठिंबा दिला आहे.

उपोषणकर्त्यांचा आरोप आहे की, शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेच्या दबावाखाली येऊन प्रशासनाने कोणतीही वस्तुस्थिती न पडताळता निर्णय घेतले असून, त्यामुळे अनेक प्रकल्पग्रस्त कुटुंबांवर अन्याय झाला आहे. प्रशासनाने कायद्याचा आधार न घेता एकतर्फी कारवाई करून नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, जवाहरलाल नेहरू बंदर (JNPA) प्रकल्पांतर्गत पुनर्वसित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या व भूखंडांच्या हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायतीतील तब्बल ३६ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या नमुना क्रमांक 8(असेसमेंट) नोंदी कोणतीही



कायदेशीर प्रक्रिया न राबविता अचानक रद्द करण्यात आल्या. या नोंदी तातडीने पूर्ववत करण्यात याव्यात, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

याशिवाय न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणातही काही घरांचे नळ कनेक्शन तोडून पाणीपुरवठा बंद करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. उलट असेसमेंट नोंद नसलेल्या बेकायदेशीर घरांना दिलेली नळजोडणी सुरू असल्याचा दावा करत, अशा जोडण्या तात्काळ बंद करण्याची मागणीही आंदोलकांनी केली आहे.

ग्रामपंचायतीतील 2012-13 आणि 2021-23 मधील कथित गैरव्यवहारांची चौकशी, त्यासंदर्भातील अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांच्याकडे तातडीने सादर करावा, दोषींवर कारवाई करावी, तसेच मालमत्ता कर न भरता नागरी सुविधा घेणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशाही मागण्या उपोषणकर्त्यांनी केल्या आहेत.

या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना (रायगड), महाराष्ट्र राज्य आरोग्य सहाय्यक/ निरीक्षक कर्मचारी संघटना, शिवसेना (हनुमान कोळीवाडा शाखा) तसेच भारतीय जनता पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. एका 91 वर्षीय वृद्ध प्रकल्पग्रस्ताला न्यायासाठी आमरण उपोषणावर बसण्याची वेळ येणे ही प्रशासनासाठी अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याची प्रतिक्रिया या संघटनांनी व्यक्त केली आहे.

आंदोलकांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, उपोषणादरम्यान आंदोलकांच्या प्रकृतीला काही अपाय झाला किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याची संपूर्ण जबाबदारी उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (BDO) आणि संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाची राहील.या उपोषणाबाबतची माहिती राज्याचे गृहमंत्री, ग्रामविकास मंत्री, कोकण विभागीय आयुक्त आणि रायगड जिल्हाधिकारी यांनाही पाठविण्यात आली असून, तातडीने हस्तक्षेप करून न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.आता प्रशासन आंदोलकांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेणार की संघर्ष अधिक तीव्र होणार, याकडे संपूर्ण उरण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# श्लोका धरम काटा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील आसडी–रहीमाबाद रोड परिसरातील श्लोका धरम काटा बांधकामाच्या भूमिपूजनाचा शुभारंभ बाबुराव पा. मिरगे यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली.

तसेच मा. सरपंच विठ्ठल पा. सुरडकर, फकिरबा पा. सुरडकर, उत्तम पा. टेकाळे, मा. चेअरमन रत्नाकर पा. सुरडकर, रामदास पा. मिरगे तसेच विठ्ठल पा. मिरगे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी लिहाखेडी येथील विविध सहकारी संस्था अध्यक्ष अशोक पाटील साखळे,सरपंच सुभाष पा. नवल,भिकन पा.मिरगे( मा.ग्रा.प.सदस्य), ज्ञानेश्वर बंनगाळे, सोमनाथ पा. डमाळे, तुपे (मुख्याध्यापक), गंगा मेटे (तंटामुक्त अध्यक्ष), रंगनाथ मेटे (पोलीस



पाटील), सांडू सुरडकर, गायकवाड सर ,दिगंबर शिरसाट, मा. सरपंच शिवाजी मिरगे, सुभाष वावधने, महाले सर, ह.भ.प. अजबराव महाराज, पंजाबराव शेठ, गेहनाजी सिरसाठ, रेवणनाथ सुरडकर, अंबादास सुरडकर, गजानन मिरगे बाबुराव टेकाळे, गजानन सुरडकर, राजू शेठ बाकलीवाल, अमोल मिरगे ,विनोद मिरगे ,(आराध्या) तसेच सर्व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या धरम काट्या मुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेती मालाचे वजन माप करण्यासाठी उपयोग होणार आहे.

# प्रहार दिव्यांग संघटनेच्या पुणे जिल्हा सचिवपदी रामदास चव्हाण यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : प्रहार दिव्यांग संघटनेच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्याच्या उद्देशाने संघटनेच्या पुणे जिल्हा सचिवपदी रामदास चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती प्रहार दिव्यांग संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष धर्मेंद्र सातव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या नियुक्ती प्रसंगी जिल्हाध्यक्ष शरद जाधव, विभागीय जिल्हाध्यक्ष सुरेश जगताप तसेच विभागीय जिल्हा महिला अध्यक्षा सुप्रिया लोखंडे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष इंगोले जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष दिवेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी रामदास चव्हाण



यांना नियुक्तीपत्र प्रदान करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, दिव्यांगांच्या विविध समस्या शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, त्यांच्या हक्कांसाठी सातत्याने पाठपुरावा करणे तसेच संघटनेचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी रामदास चव्हाण यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल.नवनियुक्त जिल्हा सचिव रामदास चव्हाण यांनी संघटनेने आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असून संघटना अधिक मजबूत करण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.या नियुक्तीबद्दल प्रहार दिव्यांग संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रामदास चव्हाण यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या यावेळी उपस्थित मान्यवर इंदापूर तालुका अध्यक्ष अनंतराव गायकवाड तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब जामदार ता.सोशल मिडिया अध्यक्ष ज्ञानदेव कांबळे ता.खजिनदार भारत शेंडे ता.कार्याध्यक्ष बापूराव काळे ता.कोषाध्यक्ष पोपट दराडे ता.सं. प्रमुख महेश्वर जगताप ता.सहखजिनदार ईनुस शेख ता.म.अध्यक्ष सुक्षला ढाणे ता.म.उपाध्यक्ष रूपाली जगताप जयश्री खारतोडे लोखंडे मॅडम संजय भोसले राजु क्षीरसागर विरकर नाना तसेच शेकडो दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# महाराजस्व समाधान शिबिरांना मुदतवाढ; २२ जुलै ते ०३ ऑगस्टदरम्यान शिबिरे

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे प्रतिनिधी तालुका अमरावती** : महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्णयानुसार "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान" राबविण्यासाठी मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शासन पुरकपत्रानुसार आता हे अभियान २२ जुलै २०२६ ते ०३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात कोणत्याही एका दिवशी आयोजित करता येणार आहे. याबाबतचे पुरकपत्र १३ जुलै २०२६ रोजी निर्गमित करण्यात आले.

महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी शासनाने विविध निर्णय घेतले असून त्याचा लाभ तळागाळातील



नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सुरुवातीला २२, २५ आणि २९ जुलै २०२६ या तीन दिवसांपैकी कोणत्याही एका दिवशी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात समाधान शिबिर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

मात्र २५ जुलै रोजी आषाढी एकादशी असल्याने राज्यातील नागरिक आणि लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणावर वारीत सहभागी होतात. त्यामुळे शिबिरांच्या पर्यायी कालावधीत वाढ करण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली होती. या मागणीची दखल घेत महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिबिरांच्या कालावधीत ०३ ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

शासन पुरकपत्रात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित शासन निर्णयातील इतर सर्व अटी व शर्ती पूर्ववत लागू राहतील. हे पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून डिजिटल स्वाक्षरीने प्रमाणित करण्यात आले आहे.

शिबिरांमधून नागरिकांना काय लाभ?

महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचा निपटारा.

विविध दाखले व प्रमाणपत्रे मिळविण्याची सुविधा.

तक्रार निवारण व मार्गदर्शन.

शासकीय योजनांची माहिती व अर्ज प्रक्रियेस मदत.

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होण्यास मदत होणार असून, महसुली कामांचा जलद निपटारा होण्यास मोठी मदत मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# हिंगोली लोकसभा मतदारसंघाच्या विकासासाठी केंद्र सरकारकडे विविध मागण्या

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे** : दि. १४ जुलै रोजी नवी दिल्ली येथे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत हिंगोली लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी विविध विकासकामांबाबत महत्त्वाच्या मागण्या मांडल्या.

बैठकीत मांडण्यात आलेल्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत:

हिंगोली लोकसभा मतदारसंघातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधा असलेले उच्च शिक्षण संस्थान (विद्यापीठ) स्थापन



करण्यात यावे.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY) अंतर्गत प्रलंबित रस्त्यांसह नवीन रस्त्यांच्या कामांसाठी तातडीने निधी मंजूर करण्यात यावा.

मतदारसंघातील रेल्वे स्थानकांवर आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त रेल्वे थांबे मंजूर करावेत.

हिंगोली शहरात विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा.

केंद्र सरकारच्या विविध योजनांअंतर्गत घरकुल, पाणीपुरवठा, गोठा अनुदान तसेच इतर विकासकामांसाठी तातडीने निधी मंजूर करावा.

हिंगोली लोकसभा मतदारसंघात अलीकडे जाणवलेल्या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक उपाययोजना व मदत उपलब्ध करून द्यावी.

खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची विनंती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे केली. या मागण्यांमुळे पायाभूत सुविधा, शिक्षण, वाहतूक आणि ग्रामीण विकासाला चालना

# योगेश्वरी शुगर्स पट्यात ऊसाला हवा पावसाचा डोस

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी/ तालुक्यातील योगेश्वरी शुगर्स लिंबा या परिसरातील ऊसाला हवा पावसाचा डोस योगेश्वरी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस शेतीला चांगले दिवस आले आहेत शेतकऱ्यांच्या उसाला चांगला दर हि मिळत असल्याने लागवडीत मोठी वाढ हि झाली आहे मात्र यंदा खरिपाच्या सुरूवातीलाच पावसाने दडी मारल्यामुळे सोयाबीन कापूस या पिकासोबतच बारमाही असलेल्या ऊस पिकाची हि वाढ पूर्णपणे खुंटली आहे यामुळे ऊस उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे ऊस पिकाच्या वाढीसाठी जून ते ऑक्टोबर हा कालावधी सर्वाधिक महत्त्वाचा मानला जातो या काळात होणाऱ्या दमदार पावसामुळे ऊसाची वाढ झपाट्याने होते मात्र यंदा जून आणि जुलै या दोन्ही महिन्यात पावसाने हुलकावणी दिली आहे योगेश्वरी शुगर्सच्या कार्यक्षेत्रातील मुदगल येथील बंधारा व तरूगव्हाण येथील बंधारा भागातील



शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर ऊसाची लागवड केली आहे यामुळे या भागाला ऊसाचा पट्टा म्हणून ओळखले जाते परंतु दीड महिन्यापासून पाऊस गायब असल्याने या भागातील ऊस पिके सुध्दा वाळू लागले आहेत दमदार पाऊस न झाल्याने भूगर्भातील पाण्याची पातळी कमालीची खोल गेली आहे त्यामुळे सिंचनासाठी विहीर व बोअरवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांसमोर ऊसासह खरिपाचे पिके जगवण्यासाठी मोठी धडपड सुरू आहे

# डॉ.स्मिता हिरे यांच्या वाढदिवसानिमित्त स्वसंरक्षण कार्यशाळा व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ. सौ. स्मिताताई हिरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयात प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री.राजेश मिश्रा ( ग्रामीण रूग्णालय समन्वयक सुरगाणा) ,श्री. राकेश महाले ( ग्रामीण रूग्णालय सुरगाणा) , डॉ.अक्षय सोनवणे ( नेत्र चिकित्सक ग्रामीण रुग्णालय सुरगाणा) यांनी डोळ्यांचे आरोग्य होणार त्रास तसेच हिमोग्लोबिनचे आहारातील महत्त्व यावर मार्गदर्शन केले.




कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रभाकर चव्हाण यांनी स्मिताताई हिरे यांच्या वाढदिवसाचे निमित्त त्यांच्या कार्यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी सांगितले की डॉ. स्मिताताई हिरे यांनी शिक्षण समूहाच्या वाटचालीत महत्वाचे योगदान दिले आहे. सामाजिक क्षेत्रात महिला सबलीकरणात आजही कार्यरत आहेत असे म्हणत डॉ. दिघावकर यांनी विद्यार्थ्यांनी जीवन जगत असताना स्वःताला निरोगी राहाण्यासाठी व्यायाम, प्राणायाम,खेळ याला महत्त्व दिले पाहिजे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे दुसऱ्या सत्रात श्री. रवी गवळी ( कराटे प्रशिक्षक अलंगुन) यांनी स्वःताचे आत्मसंरक्षण करण्यासाठी आचरणात आणावयाची आसणे उदा. स्पंच ,मिडल, अपल, लुव्हर, ब्लॉक या संदर्भात प्रात्यक्षिक करून दाखविले .

कार्यक्रमाचे प्रास्तविक व सुत्रसंचालन डॉ. संतोष पवार यांनी केले तर आभार प्रा. सुरेश भोये यांनी मानले .

कार्यक्रमाला डॉ. चंद्रकांत पाटील, डॉ.रविंद्र हिरे , प्रा. कविता भोये, डॉ.विनायक बागुल, प्रा. बाळू धुम, प्रा. संजय महाजन, गिरिधर भालेराव, ओमकार धुम,उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोराच्या वाटेकडे पाहतच थांबलेले बापाचे प्राण



एका खेड्यातील बापाचा पोरगा घाई गडबडीत घरी पोहोचला. मोटरसायकल साईड स्टॅन्डला लावली घरात शेजारी-पाजारी, गावकरी तथा नातेवाईकांची बरीच गर्दी जमलेली होती. ती नेहमीच असायची आज मात्र थोडी जास्तच होती. तो दिसताच त्यांचा जीव भांड्यात पडला. जणू काही ते त्याचीच वाट पाहत होते. काहींनी त्याच्याकडे कटाक्ष टाकला पोराने स्मितहास्य केलं. परंतु नेहमीसारखा प्रतिसाद मिळाला नाही. कटाक्ष टाकणाऱ्यांपैकी एकानेही साधे चेहऱ्यावरचे हवाभाव सुद्धा बदलले नाही. समाजशील पोराला हे विसंगत वागणं कळणार नाही एवढाही तो दूधखुळा नव्हता. त्यामुळे त्याच्या काळजात चर्रर झालं. त्याचं अवसान गळालं, त्याच्यावर जणू आभाळ कोसळलं. पन्नास फुटाचं अंतरही त्याला कित्येक किलोमीटर भासू लागलं. तो प्राण एकवटून घरात धावतच गेला. तेथे त्याला पूर्ण शांतता दिसली. कोणीही एकमेकांशी शब्दही बोलत नव्हतं. फक्त एकमेकांच्या चेहऱ्याकडे बघून नजरा-नजर चोरच होते. सर्वांच्या चेहऱ्यावर दुःखाची छटा दिसत होती. मायनं स्वतःचं मन घट्ट करून हंबरडा कंठाशी थांबवून ठेवला होता. चेहऱ्यावर दुःखाचे सावट आणि भविष्याचे संकट यामुळे भावाचे बोध हरपले होते. बहिणीला तर आपले सर्वस्व हरवल्यागत होऊन ती वेडी-पीसी भासत होती. पोरानं सगळीकडे नजर टाकली गर्दीच्या मध्ये बाप शेवटच्या घटका मोजत निपचीत पडला होता. ते बघून त्याचे हातपाय गळाले. असं नाही होऊ शकत? असे शब्द त्याच्या तोंडून अचानक निघाले. तो क्षणार्धात त्यांच्याजवळ पोहोचला. बापाने डोळे उघडून त्याला पाहिलं. पुन्हा डोळे मिटून घेतले. कदाचित त्याला पाहण्यासाठीच बापाने जीव डोळ्यात थांबवलेला असावा. कारण त्यानंतर त्यांनी अंतिम श्वास घेतला. डोळे मिटले ते कायमचेच. घरात एकच हंबरडा फुटला, सगळीकडे आक्रोश पसरला. पोरांनी घरदार डोक्यावर घेतलं. मायलेकरांचा हुंदका थांबेना. ते पाहून सर्वांचे डोळे पाणावले, प्रत्येकाच्या हृदयाला पाझर फुटला. तरीही ते मायलेकरांना धीर देत होते. “बाप काही जन्माला पुरत नसते, जो जन्माला येते तो एक दिवस मरतेच. मरण कोणालाच सुटलं नाही, एकना एक दिवस प्रत्येकाला जावंच लागते” अशा शब्दात ते त्यांचं सांत्वन करण्याचा प्रयत्न करत होते. धाकटा पोरगा थोडासा सावरला त्याने बुद्धाचा प्रतित्यसमुद्पाद तथा आणि अनित्यवादाचा सिद्धांत कुठेतरी वाचला असावा.

तेवढ्यात त्याला कामावरून घरी येताना मोठ्या भावाचे आलेले फोन आठवले, त्यावरचं बोलणं आठवलं. भाऊ म्हणाला, “आज तू घरी येण्यासाठी लवकर निघ. जास्त वेळ घालवू नको, बाबा तुझी आठवण काढत आहेत” पोराचाही नाईलाज होता, बापाच्या आजाराच्या निमित्ताने नेहमी सुट्टी घेणारा पोरगा आज पुन्हा सुट्टी साठी आर्जव करत म्हणाला, “घरी जायचं होतं, भावाचा फोन आला.” त्यावर प्रत्युत्तर मिळालं, “बरं ठीक आहे, जाताना हे दोन कागद कार्यालयात दे आणि निघून जा.”

मोटरसायकलचा वीस-पंचवीस किलोमीटरचा प्रवास मध्येच भ्रमणध्वनी खणाणला. भाऊ म्हणाला, “कुठे आहेस.” “रस्त्यात आहे, कार्यालयात दोन कागद दिले की पोहोचतोच” त्याने उत्तर दिलं. “लवकर ये” भाऊ म्हणाला. पुन्हा पाच मिनिटांनी भाऊ, अरे पोहोचला नाही? बर ठीक आहे वाटेत बहिणीकडे जाऊ नको ती इथेच आहे. तो स्पष्ट काहीच सांगत नव्हता. कदाचित त्याला काळजी वाटत असावी आपण जर बापाबद्दल बोललो तर हा घाईघाईत वेगाने येईल. बाबांचं व्हायचं ते होईलच. परंतु भाऊ मात्र सुरक्षित पोहोचला पाहिजे, असा त्याचा प्रामाणिक उद्देश असावा. भाऊ एवढे फोन का करत असावा? काही कळतच नव्हतं. कारण त्याची स्वतःची आणि बापाच्या तब्येतीची काळजी तोच घेत असल्यामुळे चर्चा, संवाद हा नेहमीचाच होता. त्यामुळे शंका घेण्याचं कारण नव्हतं.

मृत्यू हे शाश्वत सत्य आहे, जो जन्माला येतो तो मृत्यूला भेटतोच. ज्या ज्या गोष्टी उत्पन्न होतात त्या लयाला जातात, हे निसर्गाचं अंतिम सत्य आहे. त्याला अपवाद सुद्धा नाही. फक्त फरक असतो आयुमर्यादेचा, ते कोणाला कमी तर, कोणाला जास्त एवढंच!

तथागत गौतम बुद्धाचे हे तत्वज्ञान लिखाणाच्या, व्याख्यानाच्या, प्रवचनाच्या माध्यमातून जगाला सांगणारा पोरगा दुःखातून थोडासा सावरत विचार करू लागला की, तत्त्वज्ञान सांगणं सोपं असते. परंतु ते स्वीकारणं आणि त्याप्रमाणे जगणं किती कठीण असते? हे त्याला त्या दिवशी कळलं. दुसऱ्याच्या घराला आग लागल्यावर पाणी टाकण्याचा सल्ला सर्वच देतात. परंतु जीवाची खरी घालमेल तेव्हाच होते जेव्हा स्वतःच्या घराला आग लागते.

त्याने स्वतःला जरी सावरलं असलं तरी तो शून्यात नजर टाकून एकटक पाहत होता. ज्याने जन्म दिला, पालन पोषण केलं, संस्कार दिले, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला शिक्षणाचा गंधही नसताना उच्च शिक्षण देऊन समाजात लायकी निर्माण केली आणि सक्षमपणे पायावर उभं केलं. ताठ मानेनं जगायला शिकवलं. त्यांनी एकदम नजरेआड व्हावं, तेही कायमचं! यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. बापाचा त्याग, कष्ट, समर्पण, हाल-अपेष्टा पोराच्या डोळ्यासमोरून इतिहासाची पानं पलटावी त्याप्रमाणे पटापट पलटत होती.

त्याला खूप जुना एक प्रसंग आठवला. गावात सामाजिक सलोखा बिघडला त्यामुळे हाताला काम नाही. म्हणून बापाने नातेवाईकांच्या गावात आश्रय घेतला. तेथे मोलमजुरीसह शिक्षणाची उत्तम व्यवस्था होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेच्या प्रस्थापनेसाठी एके ठिकाणी आपल्या अनुयायांना असा संदेश दिलेला आहे की, ‘खेडे सोडा आणि शहराकडे चला’ कारण शहरात रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते. पुढाऱ्यांमुळे शोषणास वाव नसते. विषमता कमी असते. जातीयतेची दाहकता कमी जाणवते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून सर्वांगीण विकासासाठी वाव असतो. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा तो संदेश अनेकांनी शिरसावंध्य मानल्यामुळे त्यांचे जीवन आरपार बदलून गेल्याच्या इतिहासात नोंदी आहेत.

अक्षरशत्रू बापाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तो क्रांतिकारी संदेश माहीत होता की नाही? हे अजूनही अनुत्तरीतच आहे. परंतु परिस्थितीने त्याला गाव सोडायला भाग पाडलं. बापाला केळीच्या बागेत काम मिळालं. स्वतःचं घर नसल्यामुळे कुळाची झोपडी बांधून बाप दोन मुलांसह शेतातच राहू लागला. कुटुंबाची ताटातूट झाली. तरीही हे अग्नी दिव्य त्यानं स्वीकारलं होतं. सकाळी उठून जंगलात उघड्यावर स्वयंपाक करणे प्रशिक्षित तथा तरबेज महिलेलाही कधी कधी शक्य होत नाही. बाप मात्र सकाळ संध्याकाळ आपलं कौशल्य पणाला लावत होता. त्याला कामाचा क्षीण येताना कधीच दिसत नव्हता. कष्ट जणू त्याच्या पाचवीला पुजलेले होते. विसावा त्याच्या नसीबी नव्हताच. अगदी कष्टाळू बळकट आणि कणखर व्यक्तिमत्वाचा धनी असलेला बाप स्वभावाने मात्र दयाळू, शीलवान, कनवाळू आणि मवाळ होता. तो कधीच भांडताना दिसला नाही. आईच्या धाकात राहून प्रसंगी मार खाणाऱ्या अल्लड लेकरांवरही तो कधी रागवताना दिसला नाही. लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत सन्मानाने आणि अदबिनं बोलणं हे त्याच्या स्वभावाचं गुणवैशिष्ट्य होतं. दुसऱ्याचं दुःख पाहून दुःखी होणारा हळव्या मनाचा बाप रडताना अनेक वेळा दिसला. परंतु तेवढाच तो स्वाभिमानीही होता. त्याने कामाची कधीच लाज बाळगली नाही. हाताला मिळेल ते कबाडकष्ट करून संसार चालवणे हेच त्यानं त्याचं कर्तव्य मानलेलं होतं.

आयुष्यभर कष्टाने क्षीणलेल्या बापाला शेवटी-शेवटी सुखाचे दिवस दिसले. परंतु शरीर साथ देईनासं झालं. त्याला अनेक आजारांनी घेरलं. एक दिवस त्याला दम्याचा मेजर अटॅक आला. लेकरं एकदम घाबरले, काय कराव सुचत नव्हतं. बापाच्या प्रेमापोटी व कर्तव्याचा भाग म्हणून शहरात उच्च दर्जाचा औषधोपचार केला. कित्येक महिने घरी ऑक्सिजनवर ठेवलं. वाटेल त्या इच्छेची परिपूर्ती करत शर्थीचे प्रयत्न केले. परंतु नाईलाज! सर्वांचे हात टेकले.

कदाचित निसर्गालाही तेच मान्य असावं. त्यानेही माघार घेतली. शेवटी बापाला आपल्या कवेत सामावून घेतलं.

**भिमराव परघरमोल**
**लेखक व्याख्याता तथा अभ्यास**
**फुले शाहू आंबेडकरी विचारधारा**
**तेल्हारा जि. अकोला**
**मो. ९६०४०५६१०४**

## गुन्हेगारांवर पोलिसांचा वज्रप्रहार; सागर कोते यांच्या नेतृत्वाखाली सलग दोन धडक कारवाया



**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : लासलगाव पोलीस ठाण्यात सहायक पोलीस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारताच सागर कोते यांनी गुन्हेगारीविरोधात आक्रमक पवित्रा घेत सलग दोन धडक कारवाया करून गुन्हेगारांना कायद्याचा जबरदस्त धाक दाखवला आहे. अवघ्या दोन दिवसांत धारदार चाकूसह दहशत माजवणाऱ्या आरोपीला जेरबंद करतानाच आठवडा बाजारातील गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरी करणाऱ्या अंतरराज्यीय चोरालाही बेड्या ठोकण्यात आल्याने लासलगाव शहरात पोलिसांच्या कार्यक्षमतेची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

दि. १३ जुलै रोजी बाजारतळ परिसरात रिजवान उर्फ बॉक्सरभाई आयुब बागवान (रा. पिंजार गल्ली, लासलगाव) याने मद्यधुंद अवस्थेत एका नागरिकास मारहाण करून सुमारे १० इंच लांबीचा धारदार चाकू हातात घेऊन परिसरात दहशत निर्माण केली होती. माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सागर कोते यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीला जेरबंद केले. त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

यापूर्वी दि. १२ जुलै रोजी लासलगावच्या आठवडा बाजारात गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरी करणाऱ्या सुरज सलिम सोलंकी (रा. आहिरखेड, जि. इंदौर, मध्यप्रदेश) या अंतरराज्यीय आरोपीला पोलिसांनी रंगेहात पकडले. त्याच्याकडून चोरीचा सॅमसंग एस-२५ अल्ट्रा मोबाईल जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून न्यायालयीन कोठडी मिळविण्यात आली.

या दोन्ही कारवाया नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक विमला एम. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सागर कोते यांच्या नेतृत्वाखाली लासलगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडल्या.सलग दोन धडक कारवायांमुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा हातात घेणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असा ठोस संदेश लासलगाव पोलिसांनी दिला आहे. नागरिकांकडून या कारवायांचे स्वागत होत असून शहरात 'कोते पॅटर्न' ची जोरदार चर्चा रंगली आहे

## पावसाच्या खंडाने घाबरू नका; तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांचे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठे आवाहन!

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव मागील पाच ते सहा दिवसांपासून पावसाने ओढ दिल्यामुळे जूनअखेर पेरणी झालेल्या सोयाबीन पिकाबाबत अनेक शेतकरी चिंतेत आहेत. मात्र, अशा परिस्थितीत घाबरून जाऊन कोणतीही महागडी फवारणी किंवा अवाजवी खर्च करू नये, असे तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी स्पष्ट केले आहे. अखिल भारतीय समन्वित सोयाबीन संशोधन प्रकल्प, प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला) यांच्या वतीने सद्यस्थितीतील सोयाबीन पिकाचे व्यवस्थापन आणि उशिरा होणाऱ्या पेरणीबाबत शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण तांत्रिक सल्ला जारी करण्यात आला आहे.

जूनअखेर पेरणी झालेले सोयाबीन पीक सध्या १२ ते १५ दिवसांचे झाले असून, या अवस्थेत जमिनीतील ओलावा टिकवून ठेवणे आणि मुळांची वाढ चांगली होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शास्त्रशुद्ध पद्धतीने पीक व्यवस्थापन करावे, असे



'पावसाच्या अल्प खंडामुळे कोणताही चुकीचा निर्णय घेऊ नका. अनावश्यक फवारणीवर खर्च करण्याऐवजी कृषी विद्यापीठाच्या शास्त्रशुद्ध मार्गदर्शनानुसार डवरणी, तण नियंत्रण आणि ओलावा संवर्धनावर भर द्या. तसेच संभाव्य एल-निनो परिस्थिती लक्षात घेऊन ३१ जुलै २०२६ पूर्वी तूर व सोयाबीन पिकाचा पीकविमा काढून आपल्या पिकाचे आर्थिक संरक्षण निश्चित करा.'

— कैलास देवकर
तालुका कृषी अधिकारी, मालेगाव.

तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी सांगितले.

कृषी विद्यापीठाने शेतकऱ्यांना जमीन वाफशावर असल्यास उथळ डवरणी अथवा कोळपणी करण्याचा सल्ला दिला आहे. यामुळे जमिनीवरील पापुद्रा फुटतो, तणांचे नियंत्रण होते, जमिनीतील ओलावा टिकून राहतो आणि लहान रोपांच्या मुळांना इजा होत नाही. मातीतील ओलावा अत्यंत कमी झाला असेल आणि रोपे दुपारच्या वेळी सातत्याने कोमेजत असतील, तर हलक्या स्वरूपाचे स्प्रिंकलर (तुषार) सिंचन द्यावे.

केवळ तीन ते चार दिवसांचा पावसाचा खंड पडल्यास १९:१९:१९, युरिया किंवा पोटॅशियम नायट्रेटची तातडीने फवारणी करण्याची गरज नसल्याचे कृषी विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. मात्र, पाण्याचा ताण सात ते दहा दिवसांपेक्षा वाढल्यास आणि रोपे कोमेजू लागल्यास सकाळी किंवा संध्याकाळी १९:१९:१९ अथवा पोटॅशियम नायट्रेटचे एक टक्का द्रावण फवारण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

पीक वाढीच्या दृष्टीने १२ ते २० दिवसांचा कालावधी तण नियंत्रणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. परंतु, पीक तीव्र पाण्याच्या ताणात असेल किंवा तापमान खूप जास्त असेल, तर पेरणोत्तर तणनाशकाची फवारणी टाळावी, असेही कृषी विद्यापीठाने नमूद केले आहे.

यंदा संभाव्य एल-निनो परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांनी कोणतीही जोखीम न पत्करता ३१ जुलै २०२६ अखेर तूर व सोयाबीन पिकाचा पीकविमा काढून घ्यावा, असे आवाहन कृषी विभाग, मालेगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. नैसर्गिक आपत्ती किंवा प्रतिकूल हवामानामुळे होणाऱ्या संभाव्य आर्थिक नुकसानीपासून संरक्षण मिळविण्यासाठी प्रत्येक पात्र शेतकऱ्याने पीकविमा योजनेचा लाभ घ्यावा, असे तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी पुन्हा एकदा आवाहन केले.

## पिंपळयात नैसर्गिक शेतीचा जागर; उपतालुका कृषी अधिकारी रवी एकाडे यांचे जैविक शेतीचे प्रभावी मार्गदर्शन!

### तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'आत्मा' अंतर्गत सोयाबीन शेतीशाळा; रवी एकाडे, विजय दुधे व गणेश इढोळे यांनी दिला शाश्वत शेतीचा संदेश

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत पिंपळा येथे सोयाबीन पिकावरील शेतीशाळेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या शेतीशाळेत शेतकऱ्यांना नैसर्गिक, सेंद्रिय व जैविक शेतीचा अवलंब करून उत्पादन खर्च कमी करत अधिक उत्पादन कसे मिळविता येईल, याबाबत अत्यंत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

ही शेतीशाळा तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. कार्यक्रमात उपतालुका कृषी अधिकारी रवी एकाडे, कृषी सहाय्यक व्यवस्थापक अधिकारी विजय दुधे तसेच कृषी सहाय्यक अधिकारी गणेश इढोळे यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन सोयाबीन पिकाचे वैज्ञानिक व्यवस्थापन, संतुलित खतांचा वापर, जैविक व गांडूळ खतांचे महत्त्व, कीड-रोग व्यवस्थापन, तण नियंत्रण, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर घ्यावयाची काळजी तसेच कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध तंत्रज्ञानाची सखोल माहिती दिली.

विशेष म्हणजे या तिन्ही अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करताना शासकीय भाषेऐवजी शेतकरी बांधवांना सहज समजेल अशा सोप्या, ग्रामीण आणि गावरान बोलीभाषेचा प्रभावी वापर केला. त्यामुळे उपस्थित शेतकरी, महिला शेतकरी आणि युवा वर्गाला प्रत्येक विषय अगदी सहजपणे समजला. जैविक खते कशी वापरावीत, गांडूळ खताचा फायदा काय आहे, रासायनिक खतांवरील खर्च कसा कमी करता येईल, नैसर्गिक शेतीमुळे जमिनीचे आरोग्य कसे सुधारते आणि कमी खर्चात अधिक उत्पादन कसे घेता येईल, याची त्यांनी दैनंदिन शेतीतील उदाहरणे देत अत्यंत साध्या आणि प्रभावी भाषेत उलगडून सांगितले.

शेतकरी बांधवांशी संवाद साधताना अधिकाऱ्यांनी कोणताही औपचारिकपणा न ठेवता अगदी आपल्या माणसाप्रमाणे चर्चा केली. त्यामुळे उपस्थित शेतकरी, महिला वर्ग आणि युवा वर्गाला "आपल्यासमोर मोठे शासकीय



अधिकारी बसलेले नसून आपल्यातीलच अनुभवी शेतकरी मार्गदर्शन करत आहेत," अशी भावना निर्माण झाली. त्यांच्या सहज, मनमोकळ्या आणि आपुलकीच्या स्वभावामुळे संपूर्ण शेतीशाळेत आत्मीयतेचे वातावरण निर्माण झाले. अनेक शेतकऱ्यांनी जागेवरच प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ औपचारिक न राहता प्रत्यक्ष ज्ञान देणारा आणि शेतकऱ्यांच्या मनात विश्वास निर्माण करणारा ठरला.

यावेळी उपतालुका कृषी अधिकारी रवी एकाडे यांनी जैविक शेतीचे महत्त्व पटवून देताना रासायनिक खतांवरील वाढता खर्च टाळण्यासाठी गांडूळ खत, जैविक खते आणि सेंद्रिय अन्नद्रव्यांचा वापर वाढविण्याचे आवाहन केले. कृषी सहाय्यक व्यवस्थापक अधिकारी विजय दुधे यांनी सेंद्रिय राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाची माहिती देत खत, औषधे व बियाण्यांवरील अनावश्यक खर्च कमी करून नैसर्गिक शेतीचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. तर कृषी सहाय्यक अधिकारी गणेश इढोळे यांनी रासायनिक शेतीचा अतिरेक टाळून जैविक शेतीकडे वळल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्याबरोबरच जमिनीचे आरोग्यही चांगले राहील, असे सांगितले.

शेतीशाळेत सोयाबीन पिकातील विविध वाढीच्या अवस्था, अन्नद्रव्य व्यवस्थापन, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर, तण नियंत्रण, कीड व रोग व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, मृदा आरोग्य संवर्धन तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देऊन त्यांचा लाभ घेण्याचेही आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला शेतकरी, युवा वर्ग, कृषी सखी, कृषी मित्र तसेच परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी सखी कल्पना वानखडे, मायाताई धोंगडे, कृषी मित्र गजानन धोंगडे, गजानन चौधरी, साहेबराव धोंगडे, जनार्दन गुडदे, महादेव वानखडे, दत्ता चौधरी, दत्ता कालापाड, दशरथ पांढरे, गणपत धोंगडे, दिलीप वानखडे, सुनील डाखोरे, विनोद देवळे,विष्णू चौधरी संदीप गावंडे,सतीश गुडदे तसेच गावातील महिला व पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

“ 'सर्व शेतकरी बांधवांना माझी विनंती आहे की, जैविक खते आणि गांडूळ खतांचा जास्तीत जास्त वापर करावा. या खतांमध्ये अनेक आवश्यक अन्नद्रव्यांचा समावेश असल्याने जमिनीची सुपीकता वाढते, उत्पादन खर्च कमी होतो आणि शेती अधिक फायदेशीर ठरते. रासायनिक खतांवरील अनावश्यक खर्च टाळून जैविक शेतीचा स्वीकार करावा.'

— रवी एकाडे
उपतालुका कृषी अधिकारी, मालेगाव

“ 'सेंद्रिय राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत जास्तीत जास्त नैसर्गिक पद्धतीने शेती करावी. खत, औषधे आणि बियाण्यांवरील अनावश्यक खर्च टाळून उत्पादन वाढविण्यावर भर द्यावा. आपले उत्पन्न वाढवून नुकसान कमी करणे, हेच या अभियानाचे उद्दिष्ट आहे.'

— विजय दुधे
कृषी सहाय्यक व्यवस्थापक अधिकारी, मालेगाव

“ 'रासायनिक शेतीचा वापर कमी करून जैविक शेतीला प्राधान्य द्यावे. कमी खर्चात अधिक उत्पादन घेऊन शेतकऱ्यांनी आर्थिक बचत करावी. पर्यावरणपूरक आणि शाश्वत शेती हीच भविष्यातील खरी दिशा आहे.'

— गणेश इढोळे
कृषी सहाय्यक अधिकारी, मालेगाव